रायगड, शुक्रवार, दि. १० मे २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

# नोट फॉर व्होट

## घड्याळाचे बटण दाबा, ५०० रु. घेऊन जा; मतदार महिलांनी केला गौप्यस्फोट

## निवडणूक आयोग दखल घेऊन कारवाई करणार का?; सर्वपक्षीय नेते, कार्यकर्त्यांचा प्रशासनाला सवाल

**। रोहा । प्रतिनिधी ।**
संपूर्ण देशात लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने आदर्श आचारसंहिता राबविण्यात येत आहे. परंतु रायगड लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाने खुलेआम पैसे वाटप केल्याचा आरोप सुडकोली ग्रामपंचायत हद्दीतील खुद्द मतदारांनीच केला आहे. घड्याळावर बटन दाबा, ५०० रुपये देऊ, असे सांगत मतदारांना मतदानाच्यादिवशी अमिष दाखविण्यात आले. तसेच मतदान केल्यानंतर पैसे देताना मात्र कार्यकर्त्यांनी याचे-त्याचे नाव सांगत मतदारांना चांगलाच चुना लावला असल्याचा आरोपही सुडकोली येथील महिला मतदारांनी केला आहे.

या प्रकारामुळे संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. एका युट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत मतदार महिलांनी अजित पवार गटातील कार्यकर्त्यांची थेट नावे सांगितल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. परिणामी रायगड जिल्ह्यात घडलेल्या या प्रकाराबाबत निवडणूक आयोग कारवाई करणार का, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन व निवडणूक आयोग निवडणुकीतील गैरप्रकार रोखण्यासाठी विविध उपाययोजना राबवित असल्याचे सांगितले जाते. गाड्या तपासणी करण्यासाठी चेकनाके उभारले होते. असे असताना रायगड जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांचे वाटप झाले. त्यामुळे ही रोख रक्कम आली कुठून, चोख बंदोबस्त असतानाही पैसे वाटप झाले कसे, पान ५ वर

> सोशल मिडीयावरील व्हीडीओची पाहणी करून पुढील कार्यवाही केली जाईल.
> – नेहा उबाळे, उपजिल्हाधिकारी, निवडणूक

> या व्हिडीओवरून कारवाई होऊ शकत नाही. सध्या याबाबत तक्रार प्राप्त नाही. तक्रार आल्यास पडताळणी करून कार्यवाही केली जाईल.
> – सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड

### पैसे वाटपाचा फॉर्म्युला

पैसे वाटप करणाऱ्या पक्षाकडून एकूण मतदारांच्या ६५ टक्के व त्यापैकी ७५ टक्के मतदारांना वाटप करण्याच्या पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता. पक्षाकडून प्रत्येकी ५०० रु. देण्यात आले. तशी पाकिटे तयार केल्याचेही फोटो व्हायरल होत आहेत.

## डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणाचा आज निकाल

**। पुणे । वृत्तसंस्था ।**
अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्या प्रकरणाची सुनावणी पूर्ण झाली आहे. जिल्हा व सत्र न्यायालयात यावर सुनावणी सुरू होती. ती आता पूर्ण झाल्याने शुक्रवारी (दि.१०) या प्रकरणी निकाल लागणार असून, आरोपींना काय शिक्षा होणार? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

डॉ. दाभोलकर मॉर्निंग वॉकला गेले असताना २० ऑगस्ट २०१३ रोजी त्यांचा गोळ्या झाडून खून करण्यात आला. या घटनेने अवघे राज्य हादरले. दाभोलकरांच्या खुनानंतर तब्बल आठ वर्षांनी हा खून खटला सुरू पान ५ वर

**आजचा अग्रलेख**
**सावलीचाही संशय**

### वेधक

### हिंदूंच्या संख्येत मोठी घट

**मुंबई :** हिंदू लोकसंख्या १९५० पासून सातत्याने घटत असल्याचे तर दुसऱ्या बाजूला अल्पसंख्यांकांची लोकसंख्या वाढत असल्याचा अहवाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्थापन केलेल्या समितीने दिला आहे. १९५० पासून हिंदूंच्या लोकसंख्येत सातत्याने घट होत असल्याचेही समितीने स्पष्ट केले आहे. पीएम मोदींनी स्थापन केलेल्या आर्थिक सल्लागार समितीने २०२४ मध्ये हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. जगभरातील काही देशांच्या लोकसंख्येचा अभ्यास करुन, हा अहवाल सादर करण्यात आला आहे. पान ५ वर

### मच्छीमार संकटात

**रायगड :** वातावरणातील सततच्या बदलामुळे मासे मिळण्याचे प्रमाण अत्यल्प झाले आहे. त्यामुळे मासेमारी व्यवसाय धोक्यात आला असून, त्यावर अवलंबून असलेली हजारो कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत. मासेमारी हा रायगडातील मुख्य व्यवसाय असून, जिल्ह्यातील १५ हजार पेक्षा जास्त कुटुंब मासेमारी व्यवसायावर अवलंबून आहेत. या व्यवसायातून दररोज कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असली तरी मागील काही पान ५ वर







## भाजपाला दोनशे पार जाणे कठीण : आदित्य ठाकरे




**। पनवेल । वार्ताहर ।**
आत्तापर्यंत झालेल्या लोकसभा निवडणुकीतील मतदानानंतर हाती येणारे अंदाज पाहता इंडिया आघाडीकडे मतदारांचा कल स्पष्टपणे दिसून येत आहे. त्यामुळे ४०० तर सोडा, २०० पार जाणं सुद्धा भारतीय जनता पार्टीला कठीण असेल असा विश्वास युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला. संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ गुरुवारी (दि.९) आयोजित केलेल्या रॅली दरम्यान आदित्य ठाकरे बोलत होते.

खारघर येथून आदित्य ठाकरे यांच्या रोड शोला प्रारंभ करण्यात आला. महाविकास आघाडीच्या मित्र पक्षांतील शेकडो कार्यकर्त्यांनी आपापल्या पक्षांचे झेंडे लावत भव्य मोटार सायकल रॅली काढली होती.

आमचे मावळ मतदार संघातील भावी खासदार संजोग वाघेरे पाटील यांना भेटण्यासाठी मी आलो आहे असं म्हणत त्यांनी वार्तालापास प्रारंभ केला. ते पुढे म्हणाले की भारतीय जनता पार्टीला जेव्हा समोर पराभव दिसू लागतो किंवा ते जेव्हा जेव्हा अडचणी येतात तेव्हा तेव्हा ते देशामध्ये धार्मिक तेढ निर्माण करतात. जातीयवाद उफाळून आणतात किंवा प्रांतवाद निर्माण करतात. पान ५ वर






# कार्यकर्ते रमले आकड्यांच्या खेळात

■ सगळ्यांनाच लागली निकालाची उत्सुकता

■ नाक्या नाक्यावर चर्चांना उधाण

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

रायगड लोकसभा मतदार संघाची निवडणुक मंगळवारी (दि.७) पार पडली. उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले आहे. मतदान झाल्यानंतर आता सर्वांनाच उत्सुकता लागली आहे ती निकालाची. हा दिवस उजाडायला अजून जवळपास महिना बाकी असल्याने सर्वांनाच मतं मोजणीची उत्सुकता लागली आहे. अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या दैनंदिन कामाकडे लक्ष दिले आहे. तर, काहींनी आराम करण्याचा निर्णय घेतला आहे. नाक्या नाक्यावर मतांची आकडेमोड करीत आहेत. मतदान प्रक्रिया पार पडली आणी कार्यकर्ते आता या प्रभागात आपली ताकत त्या प्रभागात आपली ताकत, असे दावे करीत आहेत. आपलाच खासदार होणार असा दावा महायुती आणी महाविकास आघाडीचे कार्यकर्ते करीत आहेत. कार्यकर्ते जसे आकडेमोड करीत आहेत तशीच आकडेमोड नेते मंडळी देखील करताना दिसत आहेत.

यावेळी रायगड जिल्ह्यात सरासरी ६०.५१ टक्के मतदान झाले. येथे महाविकास आघाडीचे अनंत गीते व महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांची चुरशीची लढत आहे. त्यांच्या राजकीय प्रतिष्ठा व अस्तित्वाची ही



निवडणूक असल्याने या निकालाची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. एकूणच प्रचाराचा धुरळा खाली बसला आहे. आणि आता विजयाचा गुलाल उधळण्याची कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी केली आहे.

निवडणूकीची मदार ही कार्यकर्त्यांवर असते. त्यामुळेच प्रत्येक नेता कार्यकर्त्यांची मोठी फळी तयार करतो. निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यापासून उमेदवारांनी व पदाधिकाऱ्यांनी प्रचाराचे नियोजन केले होते.

> प्रचारासाठी मेहनत घेतली. आम्ही अहोरात्र प्रचार केला आहे. खूप प्रामाणिकपणे मेहनत घेतली आहे. खूपच दमछाक झाली असली तरी थकवा जाणवत नाही. आता निकालाची प्रतीक्षा आहे. आमचा उमेदवार जिंकण्याचा विश्वास वाटतो. निकालाची उत्सुकता कायम आहे.
> –अमित गायकवाड, रायगड जिल्हा युवक अध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी

त्यामध्ये कार्यकर्त्यांना अग्रस्थान होते. प्रचार फेऱ्या, बैठका, पत्रके वाटणे, मतदारांच्या गाठीभेटी घेणे, छुपा प्रचार करणे या कामांत कार्यकर्ते व्यग्र होते. प्रमुख कार्यकर्त्यांची तर दमछाक झाली. त्यामुळे मतदान झाल्यानंतर

> आमच्या उमेदवाराची विश्वासहार्यता व अनेक वर्ष केलेली विकासाची कामे यामुळे विजयाची खात्री आहे. सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तळागाळात जाऊन मेहनत घेतली आहे. आमच्या कष्टाचे नक्कीच चीज होईल, आता प्रतीक्षा निकालाची आहे.
> –रोहन राऊत, शिवसेना (उद्धव ठाकरे), उपशहर प्रमुख, पाली

त्यांनी निश्वास टाकला आहे. आता त्यांचे लक्ष निकालाकडे लागले आहे. कार्यकर्ते पार्टी कार्यालयात जमत आहेत. आपल्या उमेदवाराला किती मते मिळणार, याचा अंदाज घेण्यासाठी आकडेमोड करीत आहेत.

# छगन भुजबळांकडून तुतारीचा प्रचार

## शिवसेनेतील बड्या नेत्याचा आरोप

। नाशिक । प्रतिनिधी ।

राज्यात महायुती एकत्र लोकसभा निवडणूक लढवत आहे. परंतु, काही ठिकाणी नेत्यांमधील आपआपसातील वाद समोर येत आहे. नाशिक जिल्ह्यातून मोठी राजकीय बातमी आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते छगन भुजबळ तुतारीचा प्रचार करत असल्याचा आरोप शिवसेना आ. सुहास कांदे यांनी केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे लोकसभा निवडणुकी दरम्यान महायुतीत खळबळ उडाली आहे. आपल्याकडे फोटो आणि व्हिडिओ असल्याचे सुहास कांदे यांनी म्हटले आहे.

नांदगाव मतदार संघातून जास्त मते भारती पवार यांना मिळाले तर त्याचे श्रेय आम्हाला आणि शिवसेनेला जाणार आहे. हे श्रेय आम्हाला मिळू नये, यामुळे छगन भुजबळ तुतारीचा (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार) प्रचार करत आहेत. त्यांचे दाखवण्याचे दात वेगळे आणि खाण्याचा दात वेगळे आहेत. राष्ट्रवादीच्या नेत्याचे फोटो आणि व्हिडिओ माझ्याकडे आले आहेत, असा दावा सुहास कांदे यांनी केला आहे.

## वे|ध|क

### सुप्रिया सुळेंचा दादांवर पलटवार

**पुणे :** शिरुरमधील महाविकास आघडीचे उमेदवार अमोल कोल्हेंच्या प्रचारार्थ सुप्रिया सुळे यांनी प्रचार सभा घेतली. यावेळी सुप्रिया सुळेंनी अजित पवार यांनी केलेल्या टीकेला सुद्धा जोरदार प्रत्युत्तर दिले. यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आपला पक्ष फुटला, चोरला, वगैरे वगैरे सुरू आहे, पण मी आज तेच म्हणते, प्यार से मांगा होता ना सबकुछ दे देते. नाती तोडायला ताकद लागत नाही, नाती जोडायला ताकद लागते. मंत्री पद महत्वाचं की निष्ठा महत्वाची? हे तुम्हीच सांगा, अशी विचारणा करत सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांनी केलेल्या 'मी त्यांच्या पोटी जन्माला आलो असतो' या वक्तव्यावर पलटवार केला आहे. त्यांनी सांगितले की, आता मला त्यांचा स्वभाव माहीत आहे. तुम्हीच तुलना करा ना? कोणाला काय मिळालं याचा हिशोब करा. मला काय मिळाले आणि दादांना काय काय मिळाले. सगळं तुमच्या समोर आहे. सगळं स्पष्ट होईल. खूप सोप्प उत्तर आहे.

### चव्हाणांचा अजित पवारांना टोला

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज शिरुर येथील सभेत बोलताना मनातील खदखद व्यक्त केली. 'मी माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांचा मुलगा असतो तर मला संधी मिळाली असती. पण केवळ मी साहेबांचा मुलगा नाही, म्हणून मला संधी मिळाली नाही; हा कोणता न्याय?', असं अजित पवार आपल्या भाषणात म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यावर काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी टोला लगावला आहे. अजित पवारांना आणखी काय संधी मिळायला पाहिजे होती. त्यांच्या इतकी संधी महाराष्ट्रामध्ये कोणालाही मिळाली नाही. त्यांनी अनेक वेळेला राजीनामा दिला. पक्ष सोडून भारतीय जनता पार्टीबरोबर शपथ घेतली. तरी त्यांना पुन्हा उपमुख्यमंत्री पद दिले. त्यांना आणखी काय व्हायचंय? पंतप्रधान व्हायचं असेल तर शरद पवार काही करू शकत नाहीत, असा टोला पृथ्वीराज चव्हाण यांनी लगावला.

# अनंत गीते यांचा विजय निश्चित

■ आता फक्त औपचारिकता बाकी; माजी आ. पंडित पाटील यांचे प्रतिपादन

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रीवर्धन येथे महाविकास आघाडीच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांसाठी व त्यांचे कौतुक करण्यासाठी फटाके वाजवून आम्ही आनंद व्यक्त करीत आहोत. आता फक्त औपचारिकता बाकी आहे, असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे माजी आ. पंडित पाटील यांनी केले आहे.



श्रीवर्धन तालुका शेकाप सरचिटणीस वसंत यादव यांच्या निवासस्थानी माजी आ. पंडित पाटील व महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आले असता फटाके वाजवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी प्रतिक्रिया देताना पंडित पाटील म्हणाले की, लोकसभा निवडणुकी पुर्वी काही जणांनी श्रीवर्धन मतदारसंघात युती, आघाडी झाल्याचा आभास निर्माण केला होता. हा मतदारसंघ म्हणजे यांचीच जहागिरी आहे व या मतदारसंघात आमचे विरोधक नगण्य आहेत, असा त्यांचा गैरसमज होता.

७ मे रोजी मतदान झाले व मतदारांनी जो प्रतिसाद दिला आहे तो बघता निकालाचे चित्र स्पष्ट झाले आहे. महाविकास आघाडीचे शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार गट), शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रीय काँग्रेस, आप, सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांच्या संघटना व सामाजिक संस्था यांनी कमी वेळात चांगले काम केले आहे. हि निवडणुक म्हणजे धनशक्ती विरुद्ध गरीबांची लढाई असे चित्र श्रीवर्धन मतदारसंघात होते. मतदारांनी पाकीटांकडे न बघता प्रामाणिक व स्वच्छ उमेदवाराला मतदान केले आहे याचे चित्र या मतदारसंघाचा आढावा घेताना त्यातून स्पष्ट झाले आहे.

यावेळी श्रीवर्धन तालुक्यात ठाकरे गटाच्याच शिवसेनेचे वर्चस्व आहे हे सांगताना माजी आ. पंडीत पाटील यांनी जिल्हा प्रमुख अनिल नवगणे, संपर्क प्रमुख संजय कदम, तालुका प्रमुख अविनाश कोळंबेकर, शहर प्रमुख राजेश चव्हाण यांचे कौतुक केले.

**आनंद हा प्रामाणिक मतदारांसाठी**

पराजय हा निश्चित आहे याची जाणीव झाल्यावर खेडेगावांमधून पाकीटे वाटपाचा कार्यक्रम, तसेच गावकी ताब्यात घेण्याचा प्रयत्न झाला. मतदारांनी प्रामाणिकपणे मशाल चिन्हासमोरच बटण दाबत आपला मतदानाचा हक्क बजावला. कुठल्याही अमिषांना बळी न पडता महाविकास आघाडीला मतदान केले, त्याचाही आनंद आम्ही आज व्यक्त केला आहे.

# मतदान जनजागृती स्वाक्षरी अभियान

। पनवेल । वार्ताहर ।

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांतर्गत नागरिकांमध्ये मतदान जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्यावतीने 'स्वाक्षरी अभियान' राबविले जात असून आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी स्वाक्षरी फलकावर स्वाक्षरी करून या अभियानाचे उद्घाटन केले.




या स्वाक्षरी अभियानांतर्गत मोठा स्वाक्षरी फलक महापालिका मुख्यालयात उभा करण्यात आला आहे. उद्घाटन प्रसंगी अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, सहाय्यक संचालक नगररचना अधिकारी ज्योती कवाडे, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त मारुती गायकवाड, शहरअभियंता संजय जगताप, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, उपमुख्य लेखापरिक्षक संदिप खुरपे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सहायक आयुक्त स्वरूप खारगे, उपअभियंता विलास चव्हाण सर्वांनी आपली स्वाक्षरी करून मतदान करण्याबाबत संदेश दिला. या पध्दतीने वडाळा तलाव व पनवेल रेल्वे स्थानकावरती देखील स्वाक्षरी अभियान राबविण्यात येणार आहे.

याबरोबर मावळ लोकसभा मतदारसंघामधील १८८ पनवेल विधानसभा मतदार संघांत आशा सेविका बैठका घेऊन मतदार जनजागृती करत आहेत. तसेच, चारही प्रभागांमध्ये घरोघरी जाऊन मतदान जनजागृतीपर पत्रकाचे वाटप करत आहेत. महापालिकेच्या अधिकाऱ्यांमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन पनवेल, वळवली व पंचशील नगर येथे बचत गटांच्या बैठका घेऊन मतदान करण्याबाबत जनजागृती केली जात आहे.

# मोदींच्या टीकेवर अजित पवार गप्प : कोल्हे

। पुणे । प्रतिनिधी ।

शिवाजीराव आढळराव हे शिरुर लोकसभेची निवडणूक जिंकायची महायुतीला खात्री नाही म्हणून अजित पवार शिरुर लोकसभा मतदार संघात तळ ठोकून बसले आहेत, अशी टीका शिरुर लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हेंनी अजित पवारांवर केली आहे. अमोल कोल्हेंची शिरुरमध्ये मोठा रोड शो पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. त्याचबरोबर चंद्रकांत पाटलांनी शरद पवारांना संपवायचं आहे, असे वक्तव्य केले होते. त्यावरुन अजित पवारांनी चंद्रकांत पाटलांना सुनावले. याच पार्श्वभूमीवर अमोल कोल्हेंनी अजित पवारांवर निशाणा साधला आहे. पंतप्रधान मोदी शरद पवारांना भटकती आत्मा म्हणाले होते. त्यावेळी अजित पवार का शांत बसले, असाही प्रश्न अमोल कोल्हेंनी उपस्थित केला आहे. शिरुरची सर्वसामान्य जनता माझ्या पाठिशी उभी आहे. हे सगळं पाहता मोठ्या मताधिक्यानं मी विजयी होणार, याची खात्री आहे, असा विश्वासही कोल्हेंनी व्यक्त केला.

# निकालानंतर शिंदे तडीपार होतील

। मुंबई । प्रतिनिधी ।

अहमदनगरमध्ये खा. संजय राऊत यांनी भाजपसह मुख्यमंत्र्यांवर तोफ डागली. खा. संजयराऊतयांनीमुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला. ४ जूनपर्यंत शिंदे यांना काय तांडव करायचा आहे ते करू देत. शिंदेंनी भ्रष्टाचारावर बोलावे, स्वतःच्या भ्रष्टाचारामुळे ते गळपटले होते. आता ४ जूननंतर शिंदे हे तडीपार होतील अथवा जेलमध्ये जातील, असा दावा खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

# माणगाव शेकाप तालुका चिटणीसपदी अस्लम राऊत

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुका शेतकरी कामगार पक्षाच्या रिक्त झालेल्या तालुकाचिटणीसपदावरतालुक्यातील मोर्बा येथील पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा राजिपचे माजी कृषी सभापती अस्लम इब्राहिम राऊत यांची प्रभारी तालुका चिटणीसपदी नियुक्ती शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी केली. अस्लम राऊत यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



अस्लम राऊत हे शेकापचे जुने जाणते निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून रायगड जिल्ह्यात सर्वत्र ओळखले जातात. स्वर्गीय प्रभाकर पाटील यांच्या बरोबरही अस्लम राऊत यांना रायगड जिल्हा परिषदेत काम करण्याची संधी मिळाली आहे. माणगाव तालुक्यात शेकापची विचारधारा सर्वदूर पोहचविण्यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. रायगड जिल्हा परिषदेचे कृषी सभापती म्हणून त्यांनी चांगले काम केले असून आरडीसीसी बँकेचे ते संचालक आहेत.

माणगाव तालुक्यात आजही त्यांच्यामुळे शेकापची ओळख आहे. पक्षाच्या माध्यमातून विविध विकासाची कामे त्यांनी मोर्बा जिल्हापरिषद गटात केली आहेत. उत्तम संघटन व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची हातोटी आहे. त्यांच्या शांत व संयमी स्वभावामुळे त्यांनी तालुक्यात अनेक माणसे जोडली आहेत. बहुजन समाजात ते शेकापचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. येणाऱ्या सर्व निवडणुकांचा विचार करता तालुक्यात शेकाप अधिकतम मजबूत करण्यासाठी पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी अस्लम राऊत यांच्यावर तालुका चिटणीस पदाची जबाबदारी टाकली आहे.

यावेळी अस्लम राऊत म्हणाले कि, आजपर्यंत ज्या पद्धतीने पक्षाचे प्रामाणिकपणे काम केले, तसेच काम यापुढेही सुरु ठेऊन पक्षश्रेष्टींच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शन खाली पक्ष संघटन मजबूत करून पक्षाच्या माध्यमातून गावागावात, वाडी-वस्त्यांमध्ये विकासाची कामे करून जनतेची सेवा करेन. समाजकार्य करताना माझ्या सहकारी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन येणाऱ्या निवडणूका नजरेसमोर ठेऊन गावागावात शेकापची ध्येय-धोरणे पाहचविण्याचे काम प्रामाणिकपणे करेन, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# आपल्याच पाठपुराव्यामुळे मिनीट्रेन सुरु : जनार्दन पार्टे

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान येथून नेरळ येथे येणारी मिनीट्रेन मे २०१९ मध्ये अमन लॉज स्थानकाजवळ नॅरोगेज रुळावरून घसरली होती. त्या आठवड्यात सलग दोनदा त्याच जागेवर मिनीट्रेन रुळावरून खाली उतरली होती. त्यानांतर मध्य रेल्वे प्रशासनाने मिनीट्रेन बंद करण्याचा निर्णय घेतला होता.हि बंद पडलेली मिनीट्रेन आपल्याच पाठपुराव्यामुळे सुरु झाली, असा पुनरुच्चार माथेरानमधील सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पार्टे यांनी कागदपत्रे पुढे करीत हे जाहीर केले. तर, त्यामुळे मावळ लोकसभा



मतदारसंघाचे खासदार बारणे यांनी आपणच बंद पडलेली मिनीट्रेन सुरु केली असे सांगत असल्याने खासदार बारणे यांच्या कार्यपद्धतीवर संभ्रम निर्माण झाला आहे.

जून २०१९ मध्ये नेरळ-माथेरान-नेरळ प्रवासी सेवा बंद झाली आणि यावर्षीच्या विक्रमी पावसात माथेरान-अमन लॉज ही शटल सेवा जुलै महिन्यापासून बंद पडली. मिनीट्रेनच्या २१ किलोमीटर नॅरोगेज मार्गावर मोठ्या प्रमाणात भूस्खनन होऊन नॅरोगेजचा मार्ग वाहून गेला. यामुळे मिनीट्रेनची शटलसेवा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर माथेरान मधील सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पार्टे यांनी माहिती अधिकार यांच्या माधयमातून अपघाताचे कारण जाणून घेतले आणि त्यात मध्य रेल्वेचे सी अँड डब्लू यांच्या विभागात दोष असल्याचे ठाम मत व्यक्त केले होते. त्यांनतर जनार्दन पार्टे यांनी पत्र पाठवून मिनीट्रेनच्या खाली असलेल्या नॅरोगेज असलेली लोखंडी स्लीपर बदली करण्याचा सल्ला रेल्वे प्रशासनाने मान्य केल्याचा पार्टे यांचा दावा आहे.

माथेरान येथे प्रचारासाठी आल्यानंतर विद्यमान खासदार यांनी बंद पडलेली मिनीट्रेन आपण सुरु केल्याचा दावा केला आहे. मात्र, त्यानांतर जनार्दन पार्टे यांनी मीडियावर बंद पडलेली मिनीट्रेन आपणच सुरु केली असा दावा केल्याने खासदार बारणे यांच्या कार्यपधतीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

# पेंग्विन आणल्याचा अभिमान

**मुंबई :** देशासह राज्यात सध्या लोकसभा निवडणुकांची लगबग पाहायला मिळत आहे. लोकसभा निवडणुका होताच महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजणार आहे. यातच सध्या सुरु असलेल्या प्रचार सभांमधून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये टीकेचे सत्र सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे.

ठाकरे गटाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्यावर मागील अनेक दिवसांपासून पेंग्विन या मुद्द्यावरुन टीका केली जाते. यावर आता आदित्य ठाकरेंनी एका मुलाखतीमध्ये भाष्य केले आहे. या मुलाखतीमध्ये आदित्य ठाकरे यांनी त्यांच्यावर पेंग्विन या मुद्द्यावरुन होणाऱ्या टीकेला उत्तर दिल्याचे पाहायला मिळाले. तसेच, मी भारतात पेंग्विन आणल्याचा मला अभिमान असल्याचे यावेळी आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे. तसेच, यावेळी त्यांनी चित्त्यांचा मुद्दा उपस्थित करत भाजपवर निशाणा साधला.

# निकालानंतर महाराष्ट्रातील सरकार पडेल

। मुंबई । प्रतिनिधी ।

निवडणुकीच्या तोंडावर काही गोष्टी अंगावर येऊ नये. म्हणून मराठाआरक्षणासंदर्भातसत्तेचाउपयोग करत पोलीस रिपोर्ट अशा पद्धतीचा आणला गेला. निवडणुकीच्या तोंडावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.हीघटनासहासातमहिन्यापूर्वीची असताना निवडणुकीच्या तोंडावर हा विषय काढला हे संशयास्पद आहे. विधानसभेचे अधिवेशन होऊ घातलं होत ते होणार की नाही होणार? कारण ४ जूनला निकाल आल्यानंतर महाराष्ट्रातील सरकार पडेल. पण या प्रश्नाची फेरतपासणी व्हावी, अशी मागणी काँग्रेसच्यावतीने करत आहे, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे.



भाजप निवडणूक हरत असल्यामुळे बूथ कॅपचरचे प्रमाण देशात मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. भाजपच्या नेत्याच्या पोरांनी गुजरातमध्ये सरकार असल्यामुळे बूथ कॅप्चरिंग करून स्वतः इन्स्टाग्रामवर टाकले. लोकशाहीचा गळा घोटण्याचा काम भाजप करत आहे. निवडणूक आयोगाने तात्काळ याची दखल घ्यावी, अशी मागणी काँग्रेसच्यावतीने करण्यात आली आहे, असे नाना पटोलेंनी सांगितले.

देशातील वातावरण राहुल गांधींच्या नेतृत्वात गॅरेंटी वॉरंटी सहित दिली आहे. भाजप विरोधात प्रचंड चीड लोकांमध्ये आहे. बदलाचे वारे देशभरामध्ये सध्या पाहायला मिळत आहे. आज जगात भारत हा युवकांचा देश म्हणून नावलौकिक आहे.

बेरोजगार करण्याचा पाप नरेंद्र मोदी आणि भाजप सरकारने केले त्यामुळे युवकांना न्याय देण्याची भूमिका ही प्राथमिकता असणार आहे. अग्नि योजना बंद करून रेगुलर मिल्ट्रीची भरती करून देशातील तरुण आणि तरुणींना लढण्याचा आणि संधी देण्याचे काम काँग्रेस करणार आहोत.

पेपर लीक होण्याचं जे प्रमाण आहे, त्याला रोखण्यासाठी जन्मठेप करण्याची शिक्षा कायद्याचे रूपांतर करून आमचे सरकार आल्यावर करू, असे म्हणत पटोलेंनी लोकांना आश्वस्त केले.

# पहिल्या ३ टप्प्यानंतर मोदी अस्वस्थ

■ शरद पवार यांचे निरीक्षण

। सातारा । प्रतिनिधी ।

देशातील पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्याचे मतदान हे पंतप्रधान मोदींना अस्वस्थ करणार आहे. कारण निवडणुकीचे पहिले दोन टप्पे संपल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी आपला स्वर बदलला आहे. त्यांनी मुस्लीम समाजाचा उघडपणे उल्लेख केला. त्यांना आता धर्मांध विचार घेऊनच मदत होऊ शकते, असे वाटत असावे. जसजसे निवडणुकीचे टप्पे पुढे जात राहतील तसतसे त्यांचे स्थान हे संकटात जात आहे, अशी भावना भाजपच्या नेत्यांमध्ये असावी, असे माझे निरीक्षण असल्याचे शरद पवार यांनी सांगितले. ते गुरुवारी साताऱ्यात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

पाच वर्षांपूर्वी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला एक, राष्ट्रवादी काँग्रेसला ४ आणि एमआयएमला १ अशा सहा जागा विरोधकांना मिळाल्या होत्या. आता असं दिसतंय, आम्हा लोकांची संख्या ३० ते ३५ वर जाईल. लोकांना बदल हवा आहे. लोकांकडून काँग्रेस, राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्त्वाला



समर्थन मिळत आहे, असे शरद पवार यांनी म्हटले. यावेळी शरद पवार यांनी १७ मे रोजी मुंबईत होत असलेल्या राज ठाकरे आणि नरेंद्र मोदी यांच्या सभेबाबतही भाष्य केले. याबाबत त्यांनी म्हटले की, मोदी साहेबांना कोणाची ना कोणाची मदत हवी. त्यामधून मोदींचा आत्मविश्वास दिसून येतो, असे शरद पवार यांनी सांगितले.

**मला कोणी त्रास देत नाही:**

शरद पवार यांना सभा घ्यायला लावत आहात, त्यांना आराम द्या, तुम्ही प्रचार करा, असे अजित पवार यांनी शरद पवार गटाच्या नेत्यांना सुनावले होते. त्याला शरद पवार यांनी प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, मला कोणी त्रास देत नाही. सगळेजण माझ्यासोबत प्रेमाने वागतात. आमची सगळ्यांची पडले ते कष्ट घेण्याची तयारी आहे, असे शरद पवार यांनी म्हटले.

**काँग्रेसमध्ये विलीन होणार नाही:**

आगामी काळात काही प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील, असे वक्तव्य शरद पवार यांनी एका मुलाखतीत केले होते. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही काँग्रेसमध्ये विलीन होणार का, असा प्रश्न पवारांना विचारण्यात आला. त्यावर पवारांनी म्हटले की, मी राष्ट्रवादी पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होईल, असे म्हटले नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष अनेक वर्षे मंत्रिमंडळात एकत्र होते. आम्ही अनेक निवडणुका एकत्र लढवल्या आहेत. आताही अनेक मतदारसंघांमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी एकमेकांना सहकार्य करत आहे. विचारधारा एक असल्यावर एकत्र काम करण्याची आवश्यकता आहे, हे दोघांना स्पष्ट व्हावं, असे शरद पवार यांनी म्हटले.

## 'अभेद्य जंजीरा' पर्यटकांचे आकर्षण



(छाया : सुधीर नाझरे)

# टक्केवारी घसरवण्यात प्रशासन जबाबदार

## माजी आ. पंडित पाटील यांचा आरोप

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मतदार याद्या अद्ययावत करण्याचा गाजावाजा प्रशासनाने मोठ्या प्रमाणात केला. परंतु, मयत यांच्यासह मुंबई, पुणे येथे मतदारांची दुबार नावे मतदार यादीत कायमच राहिली. त्याचा फटका या निवडणुकीत बसल्याने मतदानाच्या टक्केवारीत घट झाली आहे. त्याला जबाबदार प्रशासनच असल्याचा आरोप माजी आ. पंडित पाटील यांनी केला. निवडणूक आयोगाने गांभीर्याने लक्ष देऊन आगामी विधानसभा निवडणुकीच्या अगोदर मतदार यादी अद्ययावत करावी, अशी मागणी देखील त्यांनी केली.



रायगड लोकसभा मतदार संघातील मतदान प्रक्रीया मंगळवारी पार पडली. १६ लाख मतदारांपैकी १० लाख मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळी यंत्रणा कामाला लागली. ग्रामीण भागासह शहरी भागात ठिकठिकाणी उपक्रम राबवून मतदान जनजागृती करण्यात आली. त्यामुळे मतदानाचा टक्का वाढण्याची अपेक्षा होती. परंतु, या निवडणुकीत प्रतिसाद फारच कमी मिळाल्याचे दिसून आले आहे.

मतदान करण्यासाठी गेलेल्या काही मतदारांची मतदार यादीत नावच नसल्याचे दिसून आले. काही मतदार मयत नसताना मयत दाखविण्यात आले. तर काही मतदार मयत असतानादेखील त्यांचे मतदार यादीत नाव असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच, नोकरी व्यवसायानिमित्त मुंबईत असणाऱ्या अनेक मतदारांची नावे बाहेरच्या ठिकाणीदेखील आहेत. दुबार मतदाराबरोबरच मयत मतदारांची संख्यादेखील मोठ्या प्रमाणात आहेत. निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीचा बोध घेत आगामी विधानसभा निवडणुकीपुर्वी मतदार यादी अद्ययावत करावी. मतदार याद्यांची पडताळणी पुन्हा करण्यात यावी, अशी मागणी माजी आ. पंडित पाटील यांनी केली आहे.



## उनाड गुरांचा मुक्त वावर

। खांब । वार्ताहर ।

रोहा-कोलाड मार्ग हा अत्यंत रहदारीचा असल्याने या मार्गावर नेहमीच वाहनांची वर्दळ असते. सध्या हा मार्ग सुरपफास्ट बनविला असल्याने रहदारीही मोठ्या प्रशाणात वाढली आहे. अशावेळेस या मार्गावर रात्री अपरात्री मुक्तपणे वावर करणारी मोकाट गुरे अपघातास कारणीभूत ठरत आहेत. सद्या उन्हाळ्याच्या दिवसात जंगल भागातील गवत नष्ट झाले आहेत, पाणी साठेही संपलेले आहेत. त्यामुळे ही गुरे पाण्याच्या व अन्नाच्या शोधात नेहमीच या मार्गावर फिरत असतात. तर, दुपारच्या वेळेस प्रखर उन्हामुळे रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या झाडांच्या सावलीचा आधार घेऊन विसावा घेतात. या मार्गावर मोठ्या प्रमाणात मोकाट गुरांची संख्या वाढल्याने वाहतुकीस अडथळा ठरत आहेत. याशिवाय कधी कधी रस्त्याच्या मधोमध ठिय्या मांडून बसून राहिल्याने किंवा रस्ताच अडवून धरल्याने वाहनचालकांच्या निदर्शनास ही गुरे न आल्याने अपघातास कारणीभूत ठरत आहेत. उनाड गुरांमुळे या मार्गावर या पुर्वीही अनेक छोटे मोठे अपघात घडले आहेत.

## मान्सूनपूर्व कामांत महाघोटाळा

### ठेकेदार, शासकीय अधिकारी मालामाल

। उरण । वार्ताहर ।

जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर दरवर्षी मान्सूनपूर्व कामांवर दरवर्षी लाखो रुपये खर्च केले जातात. मात्र, प्रत्यक्षात कामे न होताच बिले मंजूर केली जात आहेत. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नाही. या मान्सूनपूर्व कामांत महाघोटाळा होत असून त्यामध्ये ठेकेदार व शासकीय अधिकारी मालामाल होत आहेत.

उरण तालुक्यात पावसाळा सुरुवात होण्यापूर्वी एक दीड महिना आधीपासूनच नालेसफाईची कामे सुरू केली जातात. उरण परिसरात अनेक ठिकाणी भरावाची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. भराव करीत असताना जी पाणी जाण्याची नैसर्गिक स्तोत्र आहेत ती भरावाखाली गाडली गेली आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पाण्याचा निचरा कसा होईल, याचा सारासार विचार प्रशासन करताना दिसत नाही. याचा त्रास सर्वसामान्य जनतेला सहन करावा लागत आहे.

मे महिन्याच्या शेवटी मान्सूनपूर्व कामे पूर्ण करणे बंधनकारक असतानाही उरण परिसरात अशी कामे सुरू असल्याचे दिसत नाही. अधिकारी वर्गाकडे विचारणा केली असता ते उडवाउडवीची उत्तरे देतात. असा अनुभव प्रत्येक वर्षी येत आहे. संबंधित विभागाचे अधिकारी व ठेकेदार यांचे संगनमत असते, कारण दरवर्षीच तेच तेच ठेकेदार कामांचा मात्र झोल असतो.

आजच्या घडीला मान्सूनपूर्व कामे सुरू असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. परंतु, त्यातील २०% कामे ही पावसाळा काही दिवसांवर आला असताना ही पूर्णत्वास जाताना दिसत नाही. उलट काम न करताच काम पूर्ण झाल्याचे दाखवून बिले अधिकारी वर्गाकडून आर्थिक सबंधातून पास केली जात असल्याचे समजते. नालेसफाईचे बिल घेतल्यानंतर पुन्हा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पुन्हा त्याच कामांचे बिल पास केले जात असल्याचे ग्रामपंचायतच्या काही सदस्यांनी सांगितले. मान्सूनपूर्व कामांचे दोनदा बिले काढूनही परिस्थिती जैसे थे असल्याचा प्रत्यय पावसाळ्यात आम जनतेला येत आहे.

दरवर्षी निघणाऱ्या मान्सूनपूर्व कामांची सखोल चौकशी केली तर नक्कीच महाघोटाळा उघडकीस येऊन शासकीय अधिकारी व ठेकेदार मालामाल झाल्याचे उघड होईल. तरी मान्सूनपूर्व कामांची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## पनवेल, कर्जतमध्ये इंडिया आघाडीची प्रचार रॅली



हातमाग व यंत्रमाग कापडाचे
भव्य प्रदर्शन व विक्री
20% सुट
लग्नसराई निमित्त
स्पेशल ऑफर
आयोजक भाऊराया हॅन्डलुम, सोलापूर.
दि.६ मे ते ३१ मे पर्यंत स. १० ते रात्री ९ पर्यंत
सुप्रसिद्ध सोलापूरातील कॉटन ईरकली साडी, धारवाड साडी, पटोला साडी, मदुराई कॉटन साडी,
परकर, टॉप पीस, सोलापूर चादर, बेडशीट, नॅपकिन, संतरंजी, पंचा, टॉवेल,
दिवाणसेट, पिलो कव्हर, लुंगी शर्ट, कुर्ता, बंडी व असंख्य व्हरायटी
स्थळ - सार्वजनिक वाचनालय
डोंगरे हॉल, रायगड जिल्हा परिषद जवळ
मुख्य पोस्ट ऑफीस समोर, अलिबाग

# सावलीचाही संशय

राहुल गांधींचा मोठा विजय झाला आहे. निवडणुकीच्या निकालांना अजून बराच अवकाश आहे. बऱ्याच फेऱ्या बाकी आहेत. मात्र भाजप आणि त्याचे नेते धापा टाकू लागले आहेत. राहुल यांनी आजवर नरेंद्र मोदींवर अदानी आणि अंबानींच्या संबंधांबाबत कितीतरी आरोप केले. पण मोदींनी त्याला कायम झटकून टाकले. कधीही थेट उल्लेख केला नाही. आपल्या दुय्यम प्रवक्त्यांद्वारे राहुल यांची यावरून कायम खिल्ली उडवली. २०२४ च्या निवडणुकीत मात्र अघटित घडले. बुधवारी तेलंगणामधील प्रचारात मोदींनी स्वतःच अंबानी व अदानींचा उल्लेख केला. कहर म्हणजे राहुल गांधी यांनी निवडणुकीचा प्रचार सुरू झाल्यापासून या दोघांचे नाव घेण्याचे बंद का केले आहे असा सवाल त्यांनी केला. या दोन्ही उद्योगपतींकडून काँग्रेसला किती माल मिळाला आहे हे राहुल यांनी जाहीर करावे असे आव्हान त्यांनी दिले. इतकेच नाही तर या दोन उद्योगपतींकडून टेम्पो भरभरून काळा पैसा राहुल यांना पोचवला गेला असावा, असा संशयही त्यांनी व्यक्त केला. हा सर्वच प्रकार अत्यंत सुरस आणि चमत्कारिक आहे. देशाच्या सर्वोच्च नेत्याने जगातल्या सर्वाधिक श्रीमंत अब्जाधीशांची नावे घेऊन ते काळा पैसा विरोधी नेत्याला पोचवत आहेत असा आरोप करणे हेच अजब आहे. समजा असा पैसा जात असेल तर मोदींचे पोलिस काय करीत आहेत असा प्रश्न आहे. (म्हणजे ते गृहमंत्री अमित शाह यांनाही निकम्मे ठरवत आहेत की काय असा प्रश्न उद्भवतो.) काळ्या पैशांबाबत नुसता संशय व्यक्त करणे हे सामान्य माणूस करू शकतो. पण त्याची माहिती असूनही पंतप्रधान त्याबाबत थंड राहतो आणि राहुल यांनाच आव्हान देतो की, त्यांनी किती पैसे मिळाले हे सांगावे? हा सर्वच प्रकार कल्पनेच्या पलिकडचा आहे.

## घराचे वासे फिरले

मोदींच्या राजवटीत देशातल्या सरकारी कंपन्या, बंदरे, विमानतळ, धारावीसारखे विकास प्रकल्प अदानीला बहाल केले गेले. दुसरी कोणती कंपनी त्यांच्या स्पर्धेत उतरलीच तर त्यांच्यावर इडीच्या धाडी घालण्यात आल्या. जीव्हीके कंपनीच्या चौकशा सुरू करून त्यांच्याकडून मुंबई विमानतळ हिसकावून अदानीला देण्यात आला. अंबानीचा फायदा होईल अशी अनेक धोरणे राबवण्यात आली. या दोघांशी संबंधित कंपन्यांकडून भाजपला निवडणूक रोखे वा अन्य मार्गाने हजारो कोटी रुपये मिळाले तो बहुदा मोदींच्या मदतीचा मोबदला असावा. खेरीज, अदानींच्या कंपन्यांमध्ये आलेल्या वीस हजार कोटी रुपयांविषयी शंका घेतली गेली तर त्याची चौकशी देखील होणार नाही याची तजवीज मोदी सरकारकडून केली गेली. अशा स्थितीत आज तेच मोदी हे दोन उद्योगपती राहुल यांना काळा पैसा पुरवत आहेत असा जाहीर त्रागा करतात हे अनाकलनीय आहे. याचा अर्थ एकच होतो. ही निवडणूक आपल्या हातातून निसटत चालली असल्याचे त्यांना स्पष्टपणे दिसू लागले आहे. मोदी हे कमालीचे अहंमन्य आणि अरेराव नेते आहेत. त्यांच्या आसपास त्यांनी सर्व होयबा गोळा करून ठेवले आहेत. असा नेता झपाट्याने जमिनीवरच्या वस्तुस्थितीपासून दूर जातो व स्वतःच्याच विश्वात वावरू लागतो. मोदीही स्वतः विषयी भयंकर भ्रम बाळगून होते. पण आता निवडणुकीसाठी फिरताना जनता पूर्वीसारखा प्रतिसाद देत नाही हे त्यांना कळून चुकले आहे. त्यामुळे त्यांची चीडचीड होऊ लागली असून त्यांना सर्व जण आपल्याविरुध्द कट करताहेत असे वाटू लागले असावे. आपले आजवरचे प्रिय मित्र अदानी व अंबानी हेदेखील आता राहुल यांच्या समवेत गेले आहेत असा संशय त्यांच्या मनात निर्माण झाला असावा. त्यालाच त्यांनी बुधवारी वाट करून दिली. २०१४ आणि १९ च्या निवडणुकांमध्ये मोदींच्या बोलण्यात एक किमान सुसंगती होती. त्यामुळे ते प्रभावी होत असे. आता ते वाटेल ते बोलू लागले आहेत. त्रयस्थांना तर सोडाच, पण मोदीभक्तांना देखील त्याचे समर्थन करणे अशक्य होते आहे.

## खोटारडेपणाचा कळस

मोदी यांच्या यंदाच्या निवडणूक प्रचाराचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे धडधडीत खोटे बोलणे. जे बोलणे खोटे आहे हे कोणालाही सहज कळेल अशा गोष्टी ते बोलत आहेत. हिंदूंची संपत्ती जप्त करून ती मुसलमानांना वाटण्याचा काँग्रेसचा डाव आहे किंवा काँग्रेस तुमचे आरक्षण काढून घेणार आहे असे धडधडीत खोटे आरोप ते सतत करीत आहेत. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात या गोष्टी कोठेही म्हटलेल्या नाहीत हे सर्वांनी दाखवून झाले. तरीही ते त्यांचा पुनरुच्चार करीत आहेत. राहुल यांनी अदानी-अंबानीचे नाव घेणे बंद केले आहे हे म्हणणे हा तर खोटारडेपणाचा कळस आहे. गेल्या पंधरा दिवसातली राहुल यांची दहा अशी भाषणे दाखवता येतील की ज्यात त्यांनी अदानी-अंबानी आणि मोदी यांच्या संबंधांवर कोरडे ओढले आहेत. काल मोदींचे विधान आल्यानंतर राहुल यांच्या अशा कितीतरी भाषणांच्या क्लिप्स व्हायरल झाल्या. राहुल यांनी अदानी-अंबानींचा मुद्दा सोडलेला नाही हे त्यामधून पुरेसे सिध्द होते. पण प्रश्न तेवढ्यापुरता मर्यादित राहता कामा नये. राहुल यांच्या आरोपावर मोदींचे उत्तर काय हेही जनतेला कळले पाहिजे. अर्थात, ते कधीच मिळणार नाही ही वस्तुस्थिती आहे. कारण, मोदींना भलतेच मुद्दे उपस्थित करून विषय भरकटवायचा आहे. एकूण मोदींची गाडी आता घसरणीला लागली आहे. मिडियाला हाताशी धरून आणि पागल भक्तांच्या फौजा पोसून त्यांनी गेली दहा वर्षे या देशात खोट्याचे खरे आणि खऱ्याचे खोटे केले. धार्मिक विद्वेष पसरवला. त्याचा कपाळमोक्ष कधी ना कधी होणार होताच. त्याची लक्षणे दिसू लागली आहेत. गेल्या सत्तर वर्षांमध्ये या देशात काहीच घडले नाही इथपासून सुरू झालेली त्यांची एक्स्प्रेस आता राहुल अंबानी-अदानीवर बोलत नाहीत अशा वक्तव्यांवर आली आहे. हुकुमशहाची अखेर जवळ येते तसतशी त्यालाआपल्या सावलीचीही भीती किंवा संशय वाटू लागतो असे म्हणतात. ती त्याच्या शेवटाची सुरुवात असते.

विचार

# गंधवतीचा अक्षय्य सोहळा

**कधीही क्षय होत नाही ते अक्षय... अक्षय्य तृतीयेचा दिवस आणि त्यानिमित्त होणारे साजरीकरण हेच तत्त्व सांगून प्रत्येक चांगल्या गोष्टीचा क्षय रोखण्याची समज देते. ऋतूचक्रातील संहार आणि सर्जन या दोन्ही बाजू दाखवणारा हा काळ देशाच्या विविध भागांमध्ये विविध नावांनिशी आणि विविध उपचारांनी साजरा होतो. वसंतोत्सवाचे हे दिवस रस, रंग आणि गंधांनी भारलेले असतात. हे दान अक्षय्य ठेवणे आपल्या हाती आहे.**



डॉ. तारा भवाळकर

असं म्हणतात की, क्षय होत नाही वा होऊ नये अशी इच्छा असते ते म्हणजे अक्षय...! या अर्थाने मराठी पंचांगाप्रमाणे वैशाख महिन्यातील शुद्ध तृतीयेला साजरा होणारा अक्षय्य तृतीयेचा दिवस महत्त्वपूर्ण म्हणायला हवा. या दिवसाला भारतात निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळी नावे आहेत. आज आपण त्याचा फारसा उहापोह करायला नको, पण एक धावता धांडोळा घ्यायचा झाला तर बंगालमध्ये अक्षय्य तृतीयेला 'वसुबारस' मानून गाय-गोऱ्याचे कौतुक केले जाते. आपल्याकडे ग्रामीण भागात अक्षय्य तृतीयेला 'आखिती' म्हणतात. आखिती हा देशी भाषेतला उच्चार आहे. वर्षातील साडेतीन मुहूर्त सर्वात शुभ मानले जातात. अक्षय्य तृतीया हा त्यापैकी एक आहे. काही ठिकाणी तो अर्धा मुहूर्त मानला जातो तर काही ठिकाणी एक पूर्ण मुहूर्त मानला जातो. या परमशुभ दिवशी कोणतेही शुभकार्य करण्यास हरकत नसते कारण ते यशस्वी होणार याची खात्री असते.

दुसरी कल्पना अशी की, काहीजण अक्षय्य तृतीयेच्या दिवशी त्रेतायुगाचा प्रारंभ झाल्याचे मानतात तर काहीजण हा सत्ययुगाचा प्रारंभ मानतात. ओडिसामध्ये या दिवशी 'चंदनयात्रा' सजते. या दिवशी चंदनाच्या लेपाने अभ्यंगस्नान केले जाते. काही ठिकाणी या दिवशी मदनमोहनाची मूर्ती पालखीतून मिरवून तिची पूजा संपन्न होते. आपल्याकडे या दिवशी परशुरामाचा जन्म झाला असे मानतात आणि त्या निमित्ताने चिपळूणला मोठी यात्रा भरते. वेगवेगळ्या ठिकाणी या दिवसाचे वेगवेगळे पारंपरिक महत्त्व समोर येते. हा वैष्णव संप्रदायाकडे कलणारा दिवस मानला जातो.

मे महिन्याच्या सुरूवातीच्या काळात येणारा हा दिवस... या काळात रखरखीत ऊन असते. बोलीभाषेत या तापणाऱ्या दिवसांना 'वैशाख वणवा' असेही म्हणतात. रानात वणवा लागावा तसा सूर्य तापत असतो. सध्या आपण याचाही अनुभव घेत आहोत. तेव्हा रखरखीत उन्हाळ्याचे हे दिवस. संपूर्ण सृष्टी रसरसलेली, तापलेली असते, पण याच वेळी वसंत ऋतूची पालवीही फुटत असते. सृष्टीचे हे मोठे मजेशीर कौतुक आहे. एकीकडे भाजून काढणारे ऊन, झाडांची पाने शिशिरात आधीच गळून गेलेली असतात. पण नंतर ऐन चैत्रात उन्हाचा तडाखा वाढतो तेव्हा मात्र कोवळी पालवी फुटायला लागते. काही झाडांना मोहर लगडतो. आंबा, शेवगा बहरतो. म्हणजेच एकीकडे काही गोष्टी नाहिशा होत असतात तर दुसरीकडे नवी सृष्टी निर्माण होण्याच्या कोवळ्या खुणाही याच काळात दिसत असतात. म्हणूनच हा वसंतोत्सव मानला जातो. हा काळ संपूर्ण उत्तरेत आणि बंगालमध्ये वसंतोत्सव म्हणूनच साजरा केला जातो. तिथे या ऋतूमध्ये राधाकृष्ण क्रीडा खूप मोठ्या प्रमाणावर रंगतात आणि खेळल्या जातात, कारण कृष्ण हीदेखील विष्णु संप्रदायातील देवता आहे.

दुसरीकडे, या काळात रानात धुळपेरणी (उन्हाळ्यातील पेरणी) केली जाते. विशेषतः अक्षय्य तृतीयेला वेलभाज्यांची टोकणी केली जाते. म्हणजेच लहान लहान पिशव्यांमध्ये बीजे भरुन टोकणी करतात आणि त्याला थोडे पाणी घालतात. पुढे ही रोपे फुटत असतानाच पावसाळा सुरू होतो. वळीवाचा एखाद-दुसरा पाऊस पडून गेला की ही बीजे मुळे धरु लागतात आणि त्याला अंकुरही फुटू लागतात. म्हणजे झाडांना पालवी फुटत असते, मोहर येत असतो तर बीजे टोकणीतून अंकुरही फुटत असतात. एकीकडे ही निर्मिती होत असते तर दुसरीकडे उष्णतेमुळे जमीन भाजून संहारही होत असतो. म्हणजेच संहार आणि सर्जन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आपल्याला सृष्टीचक्रातील या काळात बघायला मिळतात. या सगळ्या वसंत आगमनाच्या खुणा असतात.

याच चैत्र-वैशाखाच्या काळात उत्तरेत आणि बंगालमध्ये 'दोलोत्सव' पार पडतात. त्यामध्ये अन्नपूर्णा देवीला पाळण्यात घालून झोके दिले जातात. 'दोलोत्सव' साजरा करत तिला झुलवले जाते. आपल्याकडे जुन्या परंपरेनुसार अन्नपूर्णा देवीची डोलाऱ्यामध्ये स्थापना करुन पूजा केली जाते. त्या निमित्ताने हळदीकुंकवाचा समारंभ केला जातो. त्यावेळी उन्हाळ्यात आवश्यक असणारा आणि सृष्टीने आपल्याला आपसूक दिलेला आहार सेवन केला जातो. या काळात एकीकडे भूमीतील पाणी नाहिसे होते खरे पण फळे मात्र रसदार येत असतात. मग हळदीकुंकवाच्या निमित्ताने बरोबरीच्या मित्र-मैत्रिणींना काकडी, कलिंगड, टरबूज आदी रसदार फळांचे वाटप केले जाते. थंडगार पन्हे दिले जाते. पारंपरिक धर्म वा कर्मकांड मानणारी मंडळी या काळात ब्राह्मणाला दक्षिणा, घडा तसेच शीतपेय देतात. अशा वेगवेगळ्या मार्गांनी हा रंगोत्सव साजरा होतो. तो 'रसरंग' या सुंदर नावाने ओळखला जातो.

आणखी एक गंमत म्हणजे या काळात येणारी सगळी फुले अतिशय सुगंधी असतात. म्हणजे उन्हाळा कडक तितका मोगरा, चाफा यासारख्या फुलांचा गंध मादक... म्हणजेच एकीकडे निसर्ग पाणी आटवतो पण फळांमध्ये पाणी येते. झाडे सुकतात पण नवी पालवी येते. दुसरीकडे सृष्टीमध्ये नानाविध गंध दरवळतात. म्हणजेच जणू पृथ्वीतून सगळे गंध फुलांमध्ये उतरत असतात आणि त्यानंतरच पाऊस येतो. वळीवाचा पाऊस पडल्यानंतर या तापलेल्या मातीतून गंध दरवळतो. जणू या मृद्‌गंधाच्या आधारे सृष्टी गंधोत्सव साजरा करत असते. पाने, फुले आणि मातीमधून हा गंधोत्सव साजरा होतो. म्हणूनच अशा मातीला, जमिनीला आपण 'गंधवती' म्हणतो. थोडक्यात, हा निसर्गाशी बांधलेला एक उत्सव आहे. पण हाच नव्हे तर, आपल्याकडचे सगळेच उत्सव निसर्गाशी बांधलेले आहेत. निसर्ग बदलतो तसे माणसाचे जगणे बदलत असते. मग कधी आपण त्याला देवाधर्माचे, रुढी-परंपराचे अधिष्ठान देतो आणि एखादी देवता त्याची अधिष्ठात्री असल्याचे मानतो.

एकंदरच क्षय झाला असे वाटत असतानाच पुन्हा उसळून नवी निर्मिती होते असा हा अक्षय्य तृतीयेचा, संहार आणि सर्जन यांच्या संधीकाळाचा हा काळ. सुप्रसिध्द लेखक पु. ल. देशपांडे यांचे आजोबा ऋग्वेदी यांच्या 'आर्यांच्या सनांचा इतिहास' या पुस्तकात सर्व सण सामाजिक उत्सव आहेत परंतु त्यांना धार्मिक अधिष्ठानही दिले गेले असे म्हटले आहे. सख्यांनी, प्रियकर-प्रेयसीने एकमेकांच्या संगतीत राहणे आणि सगळ्या साधनांद्वारे मनातील प्रेमभाव वृद्धिंगत करणे याला ते एक प्रकारचा प्रणयोत्सव म्हणतात. राधा-कृष्णाची गीत, सर्जनाची गीते रंगणे हा त्याचाच एक भाग आहे. या अर्थी हा सुफलनाचा काळ असतो. या काळात फलन होण्याची लक्षणे दिसतात. आपण त्याला सामाजिक विधि-विधानांचे अधिष्ठान देतो. म्हणजेच त्याला धर्माचे, सामाजिकतेचे, प्रणयाचे अधिष्ठान देतो. त्यामुळेच आपण ग्रामीण भागात गेलो तर या काळात प्रणयाची गाणीही रंगताना दिसतात. विशेषतः लावण्यांमधून हा प्रणयरंग मोठ्या प्रमाणात व्यक्त होताना दिसतो. निसर्गातील संहार आणि सर्जन याच्या सीमारेषेवरचे असे उत्सव जगाच्या पाठीवरील जवळपास सगळ्या संस्कृतींमध्ये निरनिराळ्या नावांनी साजरे होतात. उदाहरणार्थ, ख्रिश्चन लोकांमध्ये साजरा होणारा ईस्टर नामक सणही एक प्रकारे वसंतोत्सवच असतो. थोडक्यात, हा भारतीय परंपरेतील 'व्हॅलेंटाईन सिझन' असतो असे मला गमतीने म्हणावेसे वाटते. सृष्टीतील तसेच मानवी जीवनातील नवसर्जन सात्विक पद्धतीने होण्यासाठी रसरंगांची बरसात करणारा हा काळ आहे. तो अक्षय टिकावा, त्यातील प्रेमभाव, सर्जनभाव, निर्माणभाव अक्षय रहावा आणि आपणही जगावे व लोकांना जगू द्यावे हीच भावना यात दिसते. म्हणून पाण्याचे दुर्भिक्ष्य असताना ब्राह्मणाला शीतपेयाचे दान द्यावे असे म्हटले जाते, तसेच दुसरीकडे लोकजीवनात ग्रामीण तसेच शहरी भागात याच काळात पाणपोया सुरू होतात. जनावरांच्या पाण्याची व्यवस्था केली जाते. सर्वसामान्य माणसेही पक्ष्यांसाठी दारात छोटे घडे भरुन ठेवतात. परळामध्ये पाणी ओतून ठेवतात कारण जगा आणि जगू द्या, हे सूत्र आपण मानतो. पाणी आणि माती याशिवाय कोणाचेही जगणे अपूर्ण आहे. म्हणून माणूस, प्राणी, पक्षी आणि प्रणय या सगळ्यांची सांगड घालणारा हा काळ महत्त्वाचा आहे.

अर्थात सृष्टीचक्राने आपली अखंडता कायम राखणे ठरवले असले तरी बऱ्याचदा माणूस स्वार्थासाठी, विकासाच्या नावाने हे सृष्टीचक्र भकास करु पहातो. याचे अतिशय उग्र रुप सध्या आपण सगळेच अनुभवत आहोत. सृष्टीचक्रात नको ती ढवळाढवळ केल्यामुळे पर्जन्यमान, उष्णतामान, वनस्पती निर्मिती, पीक-पाणी या सगळ्यांवर विपरीत परिणाम होताना दिसत आहे. मात्र आता या सगळ्याला सावरण्याचे काम मनुष्यच करणार आहे. मात्र माणसाने ते लवकर केले नाही तर सृष्टीच्या या अनमोल देणगीअभावी माणूस भिकारी होईल, वंचित होईल आणि पुढच्या पिढ्या कदाचित गर्तेतही जाऊ शकतील. म्हणूनच पुढील पिढ्यांचा विचार करुन तरी माणसाने सावध होऊन निसर्गाचा समतोल टिकवण्यासाठी कार्यरत होणे गरजेचे आहे. विशेषतः पाणी, वनस्पती आणि वातावरणाचे रक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे इथे आवर्जून सांगावेसे वाटते कारण हे सगळे घटक अक्षय राहिले तरच अक्षय्य तृतीयेला अर्थ आहे. अन्यथा सगळेच निरर्थक होईल.

आजकाल

# निवडणूक कर्तव्यावर महिलांचा अनुभव

सोमिनाथ घोळवे



काल झालेल्या एका मतदार संघात ज्या महिलांना मतदान केंद्र मिळाले होते, त्यांचे काही नाही. ६ तारखेला साहित्य वाटप केंद्रावर गेल्यानंतर तालुक्यातील जवळजवळ १२५ ते १५० महिला ह्या राखीव होत्या. यातील काही (२५ ते ४०) महिलांना निवडणूक कर्तव्य मिळाले. मात्र ज्यांना निवडणूक कर्तव्य मिळाले नाही, त्या सर्व महिलांना ७ तारखेला सकाळी ६ वाजता साहित्य वाटप केंद्रावर हजर राहण्यास सांगितले होते. या सर्व महिला हजर राहिल्यानंतर सकाळी ९ वाजण्यापुर्वी एक चहा आणि नाष्टा दिला. त्यांनतर संध्याकाळी ५ वाजेपर्यंत जेवण नाही, नाष्टा नाही. केंद्राच्या कंपाऊंड बाहेर जाण्यास बंदी केली. मात्र तेथील निवडणूक कर्मचारी - अधिकारी वर्गाने बाहेरून जेवण पार्सल मागवून खाल्ले. मात्र राखीव महिलांना जेवण दिले नाही.

सकाळपासून ३ वाजेपर्यंत उपाशी असलेल्या दोन महिलांनी धाडस करत, ''जेवण का मिळत नाही?.'' असे एका अधिकाऱ्याला विचारले. अधिकारी वर्गाने धकमी वजा बोलले. तुम्ही निवडणूक कामात अडथळा आणत आहात, तुम्हाला निलंबित करण्यात येईल. त्या महिलांना गप्प करण्यात आले.

मात्र महिलांना दिवसभर जेवण न मिळाल्याने, खूप भूक लागल्याने सहनशीलता संपली. तेव्हा महिला एकत्र येत निवडणूक अधिकाऱ्यांना भेटल्या. त्यांना जेवणाचे विचारले. अधिकारी म्हणाले की '' जेवण मिळणार नाही. तसेच आपण निवडणुकीत अडथळा आणत आहात, या सबबी खाली गुन्हे दाखल करून निलंबित करेल.''

तेव्हा महिला म्हणाल्या की, ''गुन्हे दाखल करा. शिवाय आमचा निवडणूक भत्ता द्या'' शिवाय जे गैरहजर आहेत त्यांच्यावर देखील गुन्हे दाखल करा. तेव्हा अधिकारी म्हणाले की ''राखीव जे कर्मचारी आहेत, त्यांना निवडणूक भत्ता देण्यात येत नाही.''

त्यावर महिला म्हणाल्या की, ''आम्हाला माहीत आहे, की जेवण आणि भत्ता मिळतो. आम्हाला जेवण दिले नाही, तसेच भत्ता पण दिला नाही, अशी तक्रार करणार आहोत''.

त्यावर अधिकाऱ्यांना गांभीर्य लक्षात आले आणि अधिकारी म्हणाले, ''तुम्हाला भत्ता देतो. एका कोऱ्या कागदावर सह्या करून द्या. तसेच आपल्या जवळचे असतील त्यांना देखील सांगा..सह्या करायला''.

महिलांनी सह्या केल्या. तेव्हा भत्ता दिला. पण जेवण दिले नाही... दुपारी जेवणाची व्यवस्था करणे ही निवडणूक व्यवस्थेची जबाबदारी आहे. (जर अधिकारी वर्गाने जेवण दिले असे दाखवले, तर राखीव कर्मचारी यांच्या जेवणाचे पैसे हे धापले असेच म्हणावे लागेल) टीप: अनेक महिला वयस्कर होत्या, काही महिलांना डायबिटीस, बीपी, इतर आजार होते, त्यांना वेळेवर जेवण मिळाले नाही. जेवण वेळेवर लागते, त्या महिलांना घराच्या व्यक्तीला जेवणाची व्यवस्था करावी लागली. कमीत कमी जेवण देणार नसेल तर बाहेरून जेवण करून येण्यास परवानगी देणे गरजेचे आहे.

टीप: निवडणूक कर्तव्य असलेल्या व्यक्तीला काही तालुक्यात १३५० /- रुपये भत्ता मिळाला आहे. तर काही तालुक्यात १०००/- रुपये मिळाले आहेत. हा फरक का? असा प्रश्न देखील आहे.

लोकसंसद

## निवडणुकीची काळी बाजू

लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे निवडणुका आणि मतदान करणे. ते भारतीय नागरिकांचे कर्तव्यच आहे. मात्र लोकशाहीच्या या सर्वात मोठ्या उत्सवाला एक काळी किनार आहे. अलीकडच्या या काही बातम्या ; लोकसभा निवडणुकीच्या काळात प.बंगालमध्ये १४० कोटी रुपयांची दारू आणि ७ कोटी रुपयांची रोकड, ड्रग्ज निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाकडून जप्त करण्यात आली. आसाममध्ये आतापर्यंत १९.१० कोटी रुपयांची रोकड, ३१.०८ कोटी रुपयांची दारू, १२९.५० कोटी रुपयांची औषधे आणि अंमली पदार्थ आणि २८.८ कोटी रुपयांचे मौल्यवान धातू जप्त करण्यात आले आहेत. एकूण जप्ती २०९.७ कोटी रुपये इतकी आहे. लोकसभा निवडणुकीत जम्मू-काश्मीरमध्ये ४ कोटी रुपयांची अवैध रोकड, दारू, ड्रग्ज जप्त करण्यात आले. अरुणाचल प्रदेशमध्ये भरारी पथकाने ११.४८ लाख रुपयांची रोकड आणि दारू जप्त केली. मुंबई उपनगरात आतापर्यंत अंदाजे २० कोटी रुपयांची रोकड आणि ५६ हजार लिटरहून अधिक अवैध दारू जप्त करण्यात आली आहे. देशभरातून अशा आशयाच्या अनेक बातम्या रोजच प्रसारित होत आहेत. रोख रक्कम, दारू, ड्रग्ज, इत्यादींच्या अमिषाला बळी पडणाऱ्या अपवादात्मक भारतीय मतदारांमुळे निवडणुकीला अशाप्रकारे गालबोट लागणे दुर्दैवी म्हणावे लागेल.

**-प्रदीप शंकर मोरे**

मराठी साहित्यिक दिनविशेष

**दहा मे**

**१८५९:-** लेखक, निबंधकार, नाटककार मोरो विनायक शिंगणे यांचा जन्म. व्यवहारोपयोगी ज्ञान देण्याच्या हेतूने निबंधाची निर्मिती. अर्थशास्त्रीय निबंधाशिवाय 'सुलभ प्रसुती अर्थात अर्थ विमोचनासंबधीची माहिती व विवाह निबंध' ही त्यांची निबंधात्मक पुस्तके. तसेच 'शेरिडन' या आंग्ल नाटककारांच्या कथेवर आधारीत यशवंत - विजूचा नाटिका लिहिली. याशिवाय 'कन्या विक्रिय दुष्परिणाम' या नाटकातून वधूपिता आपली वयात आलेली मुलगी म्हाताऱ्यास देतो हा ह्या नाटकाचा विषय. **१८८४:-** संस्कृत साहित्यकृतींचा मराठी वाचकांना परिचय करुन होणारे लेखक कृष्णाजी लक्ष्मण दातार यांचे निधन. त्यांचे 'कविमुकुटमणि कालिदासकृत कुमारसंभव काव्य : सर्ग १ ते ७' हे पद्यात्मक मराठी भाषांतर प्रसिध्द. **१८८५:-** जुन्या पिढीतील एक दिग्गज कथा-कादंबरीकार, नाटयलेखक विठ्ठल सिताराम गुर्जर यांचा जन्म. १९३६ सालापर्यंत ३००हून अधिक गोष्टी, ५५ पुस्तके, १०/१२ नाटके त्यांनी लिहिली. बंगाली कादंबऱ्यावरुन रत्नदीप (पौणिमेचा चंद्र)फङ्गनविन संन्याशी (संसार असार), स्वप्नभंगफ अशा कादंबऱ्या लिहिल्या. **१८८९:-** अनुवादक, इतिहासलेखक नारायण दामोदर सावरकर यांचा जन्म. स्वा.सावरकरांच्या ङ्गहिंदुत्वफ या ङ्गहिंदुपद पादशाहीफ या इंग्रजी ग्रंथाचा त्यांनी मराठीत अनुवाद केला. **१९०६:-** महामहोपाध्याय भीमाचार्य झळ्ळीकर यांचे निधन. 'न्यायदर्शन' हा त्यांचा समजण्यास अत्यंत कठीण पण इतर सर्व दर्शनांच्या अभ्यासाला सहायक ठरणारा कोषाग्रंथ त्यांच्या हातून साकारला. याशिवाय 'न्यायभारती' हा अनुवादीत ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१९१९:-** लेखक मल्हारराव भाऊराव जगताप यांचा जन्म. 'गांवरहाटी', 'महाराष्ट्राची ग्रामीण समाज रचना' या पुस्तकांचे ते सहलेखक आहेत. **१९२१:-** लेखक, पत्रकार, संपादक आणि कादंबरीकार गणेश विठ्ठल कुळकर्णी यांचे निधन. 'व्यक्तिपात' या टोपणनावाने वृत्तपत्रातून चटकदार लेखन करणाऱ्या गणेशरावांनी 'सहस्त्रकार' या साप्ताहिकाचे आणि 'उद्यान','नवयुग'या मासिकांचे संपादनही केले. याशिवाय 'चंद्रचूड', 'कर्मसंन्यास','हा संशयाचा प्रताप', 'जन्मठेप','सोनेरी खंजीर','योगायोग' अशा सात कादंबऱ्या लिहिल्या. लेखकावर आगरकरांच्या विचारांचा पगडा असल्याने त्यांच्या कादंबऱ्या ह्या सामाजिक स्वरुपाच्या आहेत. याशिवाय 'संगीत प्रबोध' हे एक नाटकही त्यांच्या नावावर आढळते. **१९२६:-** लेखिका सरोजिनी गोपाळ देशपांडे यांचा जन्म. 'कालपक्ष' हा त्यांचा ग्रंथ आणीबाणीच्या काळात तुरुंगात असताना केलेले आत्मकथन होय.**१९३२:-** ख्यातनाम गीतकार आणि कथा, पटकथा, लघुकथा, नाटयलेखक जयदीश खेबूडकर यांचा जन्म. १९७४ मध्ये 'स्वरमंडळ' ही नाटयसंस्था स्थापन केली. १९८० मध्ये 'रंगतरंग' आणि १९८२ मध्ये 'रसिक कला केंद्राची स्थापना. १९८६ मध्ये 'अभंग' थिएटर्स स्थापना. या सर्व संस्थाद्वारे शेकडो कार्यक्रम. ह्यांच्या साहित्य संपदेत वयाच्या सोळाव्या वर्षी - म. गांधी मृत्यूनंतर 'मानवते तू विधवा झालीस' हे पहिले दीर्घ काव्य लिहिले. त्यानंतर हजारो चित्रपटगीते, पोवाडे, अभंग, ओवी इ. काव्यप्रकारात लेखन, २५ पटकथा, ५० लघुकथा, ५ नाटके, ४ दूरदर्शन मालिका. अशी विपूल साहित्य संपदा त्यांच्या नावावर आढळते. **१९३४:-** रंगभूमीविषयक अभ्यासक, बालनाटय लेखिका, तसेच दोन हजाराहून अधिक नाटयप्रयोगातून भूमिका करणाऱ्या सुधा सुधाकर करमरकर यांचा जन्म. यांचे 'अल्लाउद्दीन आणि जादूचा दिवा' व 'जादूचा वेस' हे बालनाटय आणि बालरंगभूमी विषयक पुस्तकाचे लेखन केले आहे. **१९३५:-** लेखिका लिला शांतिकुमार शाह यांचा जन्म. आतापर्यंत ६०च्या आसपास पुस्तके प्रकाशित. चरित्रे, बालसाहित्य, कथा, कविता, कादंबरी इत्यादी क्षेत्रात त्यांच्या लेखणीला मुक्त संचार. 'अनाथांची माई सिंधूताई' हे समाजसेविका सिंधूताई सकपाळ यांच्यावर लिहिलेली त्यांचे लोकप्रिय पुस्तक. गेल्या २५ वर्षापासून 'श्रमिक' मासिकाच्या संपादक मंडळावर कार्यरत असणाऱ्या लिला शाह यांच्या तीन पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार लाभले आहेत. २० मार्च २०२३ रोजी यांचे निधन झाले. **१९४६:-** कथा-कादंबरी लेखक दिलीप वसंत कुलकर्णी यांचा जन्म. पेशाने इंजिनिअर यांची 'सागरपुत्र' ही कादंबरी, 'हास्यम् शिवम् सुंदरम्म ही विनोदी कथा आणि जेम्स हॅडले चेस यांच्या इंग्रजी कादंबरीचा 'हेन्री शेरमननं असं का केलं?' असा अवुवाद केला. **१९७३:-** लेखक मिलिंद रंगारी यांचा जन्म. 'बोनस मिळणार आहे', 'रुद्रावतार वसुंधरेचे' ह्या नाटिकेसह 'झाडीची माती' हा झाडी कविता संग्रहासह काही संपादित ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१९८०:-** लेखक लक्ष्मण बळवंत उर्फ अण्णासाहेब भोपटकर यांचा जन्म. भाषा व लोकसंग्रह भोपटकर त्यांचे वडील बंधू. अण्णांनी ङ्गया वृत्तपत्रांचे संपादक पद भुषवले. याशिवाय व्यायामावर काही पुस्तके लिहिली. तसेच लाला लजपतराय यांच्या पुस्तकाचा आणि बिपिनचंद्र पाल यांच्या व्याख्यानांचा अनुवाद केला. याशिवाय मराठी वीरांच्या शौर्यकथा 'नवरत्नांचा हारफ या पुस्तकातून साकारलाय. काही राजकीय विषयांवरही त्यांनी पुस्तके लिहिलीत. **१९८१:-** विनोदी साहित्याचे लेखक, विज्ञानाचे अभ्यासक, सामाजिक चळवळीचे अभ्यासक आणि मराठी साहित्य विवात विमादी पटवर्धन या नावाने प्रसिध्द असणारे साहित्यिक विनायक माधव दिक्षित पटवर्धन यांचा जन्म. लेखनाची सुरुवात विविध वृत्तमधून शास्त्रीय विषयावरील लेखनाने. हार्डीच्या 'हंस' या कादंबरीचे 'रत्ना' या नावाने रुपांतर. 'जीवाची मर्दुमकी','जिते रहो जिवा','दीडशहाणे' या कथासंग्रहासह 'कागदी घोड' हे संवादात्मक लेखन त्यांचे गाजले. याशिवाय 'हास्यकथा','किती हासाल' ह्या लहान मुलांसाठी पुस्तकांसह अनेक व्यक्तिचित्रणे, नाटके, प्रहसने त्यांनी लिहिलीत. **१९९०:-** लेखक, चित्रपट निर्माते, सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक विनायक श्रीपाद राजगुरु यांचे निधन. 'ओसाडगाव : तीन पानी डाव' ह्या कादंबऱ्या. 'कलाकार' हे नाटक, 'लोकशाही समाजवाद - परिसंवाद' हे संपादित साहित्य प्रसिध्द.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० मे
१) श्री. मधुकर हरिश्चंद्र पाटील
मु.पो.खंडाळा, अलिबाग
१०-०५-१९४३
२) श्री. मधुकर व्यंकटेश देवरे
श्रीबाग-२, अलिबाग
१०-०५-१९३५


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**कै. दादा दळी, स्मरणार्थ अलिबाग**
**श्री. श्रीराम प्रभू, अलिबाग**
**सौ. मनीषा उमेश म्हात्रे, करमरकर आळी, थळ**



श्री. चंद्रशेखर विठ्ठल कुवळेकर, स्मृतिदिन

## वार्षिक परतावा भरण्याची मुदत ३१ मे पर्यंत

**रायगड :** सर्व उत्पादक व आयातदार अन्न व्यवसायिकांनी अन्न सुरक्षा मानदे कायद्या नुसार त्यांच्या आस्थापनेत उत्पादित/आयात केलेल्या अन्नपदार्थांबाबत वार्षिक परतावा सादर करणे बंधनकारक असून उत्पादक व आयातदार अन्न व्यवसायिकांना वार्षिक परतावा भरण्याची मुदत ३१ मे २०२४ पर्यंत आहे. सर्व उत्पादक व आयातदार पेढ्यांनी आपला वार्षिक परतावा ३१ मे पर्यंत अगोदरच foscos.fssai.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन दाखल करावा. असे आवाहन सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन पेण यांनी केले आहे.

# सुक्या म्हावऱ्याची चलती

## मागील महिन्यापेक्षा झाली स्वस्त \ अगोटीसाठी खरेदीची लगबग



**। सुधागड-पाली। वार्ताहर ।**

पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. पुढील महिना १ जून पासून दोन महिने पावसाळ्यात मासेमारी बंद असते. पावसाळ्यातील बेगमीसाठी सुकी मासळी हक्काची जिन्नस आहे. आणि मग यावेळी मांसाहारी खाणाऱ्यांना सुक्या मासळीचा उत्तम पर्याय असतो. त्यामुळेच या दिवसांत सुकी मासळी खरेदी व साठवण करण्याची अनेक जणांची लगबग सुरु आहे. मागील महिन्याच्या तुलनेत आता सुक्या मासळीचे भाव किलो मागे ५० ते १०० रुपयांनी कमी झाले आहेत. परिणामी खवय्ये सुकी मासळी खरेदीची घाई करत आहेत.

> पावसाळ्यात खाण्यासाठी सुकी मासळी साठवून ठेवते. त्यामुळे दर वर्षी या दिवसांत सुकी मासळी खरेदी करते. घरच्या मंडळींना जेवणात मासे मटण नसले तर सुकी मासळी आवर्जुन लागते. त्यामुळे सुकी मासळी खरेदी केली आहे. पेडली येथे चांगल्या दर्जाची सुखी मासळी मिळते.
> –छाया म्हात्रे, गृहिणी, पाली,

सध्या जिल्ह्यातील आठवडा बाजार व मासळी बाजारात सुकी मासळी खरेदीसाठी रेलचेल सुरु आहे. पावसाळ्याच्या चार महिन्यात भाजीपाला व मासळी यांची आवक कमी होते. आणि त्यांचे भाव देखील वधारतात अशा वेळी घरात साठवुन ठेवलेली सुकी मासळी काढली की मग जेवण चांगले जाते. मागील वर्षभरात समुद्रात अगदी कमी प्रमाणात मासळी सापडत आहे. सापडलेली मासळी ताजी विकण्यावर मच्छिमारांचा कल असतो. मासळी आधीच कमी मग सुकविण्यासाठी कुठून उरणार त्यामुळे मासळी फार कमी जण सुकवितात. मात्र तरीही हे सुकी मासळी पुरेशी असल्याने जिल्ह्यासह पुणे मुंबई या शहरातील पर्यटक व नागरिक आवर्जून खरेदी करून घेऊन जातात.

या दिवसांत डोक्यावर सुकी मासळीची टोपली घेऊन विक्रेत्या गावोगावी आणि घरोघरी दिसताना दिसतात. दारात सुकी मासळी विकायला येत असल्यामुळे अनेकजण दारातच खरेदी करतात.खोपोली-पाली राज्य महामार्गावर पेडली हे गाव सुक्या मासळीचे हब म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी सुक्या मासळीची अनेक दुकाने आहेत. त्याचबरोबर या मार्गावर चीवे येथे देखील सुकी मासळी विक्रेते बसतात. त्यामुळे पुणे आणि मुंबईकडे जाणारे प्रवासी व पर्यटक आवर्जून येथे थांबून चांगल्या दर्जाची सुकी मासळी खरेदी करतात. इतर ठिकाणी मिळणाऱ्या मासळीपेक्षा येथे विविध प्रकारची सुकी मासळी योग्य दरात मिळते.

### भाव प्रतिकिलो

१) साधे सोडे – १२०० ते १४००
२) उच्च दर्जाचे सोडे – १६०० ते १८००
३) बांगडा – २० व २५ रुपये १ नग.
४) अंबाडी – ४०० व ५०० रुपये.
५) सुका जवला – २५० व ३०० रुपये
६) मोठे बोंबील – ४०० व ५०० रुपये.
७) छोटे बोंबील – ४०० रुपये.
८) साधी सुकट – १५० व २०० रुपये.
९) माकुल – ६०० रुपये किलो.
१०) पांढरी मोठी वाकटी – ६०० रुपये
११) छोटी वाकटी – २०० व २५० रुपये.
१२) मांदेली – २०० रुपये.
१३) मासे सुकट (खारे)– ६०० रुपये
१४) रेपटी – ३५० रुपये.
१५) सुरमई – ६०० रुपये.

> मागील महिन्याच्या तुलनेत आता सुक्या मासळीचे भाव कमी झाले आहेत. पावसाळ्यातील बेगमीसाठी खवय्ये आवर्जून सुकी मासळी खरेदी करतात. पुणे मुंबईकडे जाणारे प्रवासी व पर्यटक तसेच स्थानिक नागरिक ही खरेदी करतात. किमती कमी झाल्यामुळे अधिक खरेदी करत आहेत. ग्राहकांना उत्तम दर्जाची सुकी मासळी योग्य दरात पुरवतो.
> –सुनील सावंत, सुकी मासळी विक्रेता,

# तरुणांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे



**। पाली /बेणसे । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि महाराष्ट्र इंडियन रेस्क्यू अकादमी यांचे संयुक्त विद्यमाने कोलाड येथे २३ एप्रिल ते ३ मे रोजी दहा दिवसीय बेसिक फ्लड रेस्क्यू कोर्स आणि पीबीएच प्रमाणपत्र निवासी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

सदर प्रशिक्षणात रायगड जिल्ह्यातील स्वयंसेवकांना विविध प्रकारचे रेस्क्यू ट्रेनिंगचे धडे, थेरी व प्रात्यक्षिकाचे प्रशिक्षण देण्यात आले. वाढत्या समस्यांचे निवारण करणे ही काळाची गरज बनली आहे. अशातच भविष्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन रायगड प्रमुख सागर पाठक व इंडियन रेस्क्यू अकॅडमी रोहा कोलाड यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.सदर प्रशिक्षणामध्ये नागरी संरक्षण दल, आपदा मित्र, पोलीस मित्र, एनसीसी कॅडेट, एनएसएस स्वयंसेवक, , रेस्कुअर, गिर्यारोहक आणि सामाजिक संस्थांमध्ये पुढाकाराने समाजकार्य करणारे स्वयंसेवक उपस्थित होते.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन रायगड प्रमुख सागर पाठक साहेब, इंडियन रेस्क्यू अकॅडमी रोहा कोलाड, जनरल मॅनेजर अमोल जाधव, कॉर्डिनेटर राजेंद्र पाटील, मास्टर ट्रेनर देविदास पाटील, मास्टर ट्रेनर कोंडाला राव, राज भोई, विनय पारंगे, अनिकेत जाधव, शुभम जाधव, अमित खैरे, राज तांबे, रुचिका शिर्के, सुयोग शिंदे, अनुप देशमुख व कॅन्टीन मॅनेजर बाळकृष्ण शेलवले इत्यादी प्रशिक्षकांनी यशस्वीरित्या प्रशिक्षण दिले.

## रसायनी एच.ओ.सी. स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा



**। रसायनी । राकेश खराडे ।**

शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, स्नेहसंमेलन आणि त्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी गप्पा करून जुन्या आठवणींना उजाळा दिला.

१९९९ साली म्हणजेच जवळपास २५ वर्षांपूर्वी दहावीपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या एच.ओ.सी. स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहभेटीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी ८९ विद्यार्थी, २३ शिक्षक आणि २ शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या शाळेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज राजकारण, उद्योग, शिक्षण, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात काम करीत असून त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला आहे.

सकाळी ९ वाजता शाळेतील माजी विद्यार्थी आणि शिक्षक एकत्र आल्यावर सर्वांचे शब्द सुमनाने स्वागत करण्यात आले. त्यानंतर आमच्या लाडक्या शिक्षकांनी त्यांच्या शुभहस्ते गणेश पूजन आणि दीप प्रज्वलन केले.रसायनी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बांगर यांनी नारळ वाढवून कार्यक्रमाचा श्री गणेशा केला. शाळेची घंटा झाल्यावर नेहमीप्रमाणेच प्रीती होनावळे हिने आपल्या गोड आवाजाने प्रार्थनेला सुरुवात केली आणि शाळा भरली.

# पर्यावरणप्रेमींची कर्नाळाकडे पाठ

**। पनवेल । वार्ताहर ।**

यंदा सर्वाधिक तापमानाची नोंद पनवेलमध्ये झाल्यामुळे येथील कर्नाळा पक्षी अभयारण्यात एप्रिल महिन्यात पर्यटकांची संख्या २५ टक्केच नोंदविली गेली आहे. ४४ अंश सेल्सिअसच्या तापमानामुळे मागील वर्षीपेक्षा साडेचार हजार पर्यटक एप्रिल महिन्यात कमी आल्याची नोंद वन विभागाकडे नोंदविली गेल्याने मे महिन्यात उन्हाचा पारा कमी असल्यास पर्यटकांना कर्नाळा पक्षी अभयारण्यात भटकंती करता येईल.




दीडशेहून अधिक पक्षी, दुर्मीळ वृक्ष, प्राण्यांचा मुक्त वावर आणि कर्नाळा किल्ला या साऱ्या निसर्गसंपदेमुळे हे पक्षी अभयारण्य सुट्यांच्या दिवसात गिर्यारोहक, पक्षीप्रेमी, निसर्गमित्र आणि प्राणी मित्रांचे हक्काचे ठिकाण बनले आहे. कायम स्वरूपी वास्तव्यासोबत या अभयारण्यात स्थलांतरित पक्ष्यांची मोठी संख्या आहे. अनोख्या पक्ष्यांमुळे ज्येष्ठांसोबत बालकांना येथे वेळ घालवायला आवडतो. मात्र यंदाचा उन्हाळा न सोसावणारा असल्याने पर्यावरणप्रेमींनी कर्नाळाकडे पाठ फिरवल्याचे दिसते. अभयारण्यातील प्राणीपक्ष्यांना उन्हाळ्याच्या झळांमध्ये पिण्याचे पाणी सुरळीत मिळावे यासाठी वन विभागाने ३० ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. पाण्याने भरलेले सिमेंटचे लहान पातेले प्राण्यांसाठी बनवून या पाणवठ्यांना पाण्याने भरत असल्याची माहिती वन विभागाचे अधिकारी एन. डी. राठोड यांनी दिली.

मागील वर्षी कर्नाळा पक्षी अभयारण्याला ७८ हजार ७४६ पर्यटकांनी भेट दिली. यामध्ये एप्रिल महिन्यात ७,३४८ पक्षी प्रेमी आले होते. मात्र यंदाच्या एप्रिल महिन्यात अवघे २,८५७ पक्षी प्रेमींची नोंद प्रवेशद्वाराच्या नोंदवहीत झाली. एप्रिल महिन्यात अभयारण्यात २,४१८ प्रौढ व्यक्ती, २७८ मुले, १५३ विद्यार्थी आणि ८ विदेशी नागरिक आल्याची नोंद झाली आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये माडप येथील वाशिवली पारनेरकर महाराज येथे शिकत असलेल्या १७ वर्षीय मुलीला पळवून नेऊन अत्याचार केल्याची घटना घडली आहे. ११ वीचा निकाल आणण्यासाठी गेली असताना तिला भिंगार येथील विवाहित तरूण अल्पेश नाईक याने फुस लावून पळवून नेले.

याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात १७ वर्षीय मुलगी हरवल्याची तक्रार मुलीच्या आई-वडिलांनी रसायनी पोलीस ठाण्यात केली होती. आरोपी अल्पेश नाईक याने त्या मुलीस दांडफाटा येथे आणून सोडले. या सहा दिवसात मुलीला अज्ञात ठिकाणी ठेवून आरोपी अल्पेश नाईक याने तिच्याबरोबर अत्याचार केले असल्याचे समजले. याप्रकरणी आरोपी अल्पेश नाईक याला रसायनी पोलिसांनी ताब्यात घेतले असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मिनल शिंदे करीत आहेत.

## विशाखा काव्य पुरस्कारासाठी कवितासंग्रह पाठविण्याचे मुक्त विद्यापीठाचे आवाहन

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे नवोदित कवीच्या पहिल्या प्रकाशित काव्यसंग्रहासाठी विशाखा काव्य पुरस्कार देण्यात येतात. १ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ आणि १ जानेवारी २०२३ ते १ डिसेंबर २०२३ या दोन वर्षात ज्या नवोदित कवींचा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे, अशा कवींकडून कवितासंग्रह मागविण्यात आले आहेत.

२०२२ आणि सन २०२३ करिता स्वतंत्रपणे प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे तीन विशाखा काव्य पुरस्कार देण्यात येतील. या पुरस्कार बाबतचा अधिकचा तपशील आणि नियमावली विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार कवींनी आपला कविता संग्रह विद्यापीठात दिनांक ३० जून २०२४ किंवा त्यापूर्वी पोहचतील अशा बेताने पाठवावेत. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन आणि कुलसचिव दिलीप भरड यांच्या सूचनेनुसार, या पुरस्कारासाठी अधिकाधिक मराठी भाषक नवोदित कवींनी आपला पहिला प्रकाशित काव्यसंग्रह पाठवून सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार यांनी केले आहे.

प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार, समन्वयक, कुसुमाग्रज अध्यासन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, गोवर्धन, नाशिक ४२२२२२ येथे कवितासंग्रह पाठविण्याचे आवाहन केले आहे.

## उप प्रादेशिक परिवहन कार्यालय नवीन जागेत स्थलांतरित

**। रायगड । प्रतिनिधी ।**

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय पेण या कार्यालयाचे सर्व कामकाज जिते येथील नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आले असून वाहन व अनुज्ञप्ती संदर्भातील सर्व कामकाजासाठी जनतेने जिते या ठिकाणी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते यांनी केले आहे.

जिते या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आलेल्या शासकीय जागेत रस्ता सुरक्षा हॉल व कार्यालयीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून २३ मार्च रोजी परिवहन आयुक्त, विवेक भीमनवार यांच्या हस्ते या इमारतीचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला आहे. पेण- विकासस्मृती या इमारतीमध्ये सुरू असलेले अनुज्ञप्ती विभागाचे सर्व कामकाज २९ एप्रिलपासून जिते येथील नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे.

## शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु

**रायगड :** सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, हे गौरीनंदन अपार्टमेंट, गणेशमंदीर शेजारी कार्यरत आहे. या वसतिगृहाची मान्य संख्या ७५ आहे. या वसतिगृहात इ.८ वी पासून अनुसूचित जाती- ८० टक्के अनुसूचित जमाती- ०३ टक्के, विमुक्त जाती, भटक्या जमाती- ०५ टक्के, आर्थिक मागास व इतर मागास वर्गातील दारिद्र्यरेषेखालील कुटूंबातील विद्यार्थी ५ टक्के, विशेष मागास प्रवर्ग- ०२ टक्के, अनाथ- ०२ टक्के, अपंग- ०३ टक्के प्रवर्गनिहाय आरक्षण आहे.या वसतिगृहामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो.

प्रवेशपात्र विद्यार्थ्यांनी ऑफलाईन प्रवेश अर्जासोबत सक्षम अधिकाऱ्यांचे सहीचा उत्पन्नाचा दाखला, जातीचे सक्षम अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्र, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, बँक खाते पासबूक झेरॉक्स, रहिवासी दाखला, पासपोर्ट साईज फोटो- २ आधारकार्ड या कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहेत.शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे वसतिगृहात विनामूल्य उपलब्ध करण्यात आले आहेत. अधिक माहितीकरिता गृहपाल, एस.एफ. कदम यांच्याशी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणाचा आज निकाल

होण्यास मुहूर्त लागला. खुनाचा तपास पूर्ण होऊन पुण्यातील विशेष न्यायालयाने ५ आरोपींविरोधात आरोप निश्चित केले आणि खटल्यास सुरुवात झाली. जवळपास अडीच वर्षांपासून हा खटला चालू होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा खून झाला होता. सुरुवातीच्या काळात पुणे पोलीस या खुनाचा तपास करीत होते. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या आदेशावरून या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपविण्यात आला. १५ सप्टेंबर २०२१ रोजी डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणात डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, सचिन अंदुरे, शरद कळसकर, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे या पाच जणांवर आरोप निश्चित करण्यात आले. तावडे, अंदुरे, कळसकर आणि भावे यांच्यावर भारतीय दंडसंहिता (आयपीसी) कलम ३०२ (हत्या), १२० (बी) (गुन्ह्याचा कट रचणे), ३४ नुसार आणि शस्त्र अधिनियम संबंधित कलमांतर्गत आणि यूएपीए अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. यातील संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे हे दोन आरोपी सध्या जामिनावर बाहेर आहेत.दरम्यान, सुरुवातीला या खटल्याची सुनावणी वर्षभर जिल्हा न्यायाधीश एस.आर. नावंदर यांच्या न्यायालयात सुरू होती. त्यानंतर नावंदर यांची बदली झाल्याने सध्या पी.पी. जाधव यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी सुरू आहे. सीबीआयचे वकील प्रकाश सूर्यवंशी यांनी या प्रकरणात २० साक्षीदार तपासले.

## मच्छीमार संकटात

दिवसांपासून ही उलाढाल ठप्प झाली आहे. त्यामुळे मच्छीमार कुटुंबीयांची आर्थिक घडी विस्कटली आहे.ऑगस्ट महिन्यापासून पारंपरिक मासेमारीपाठोपाठ पर्ससीननेट मासेमारीही सुरू होते. मात्र, गेले काही महिने मासे मिळण्याचे प्रमाण चांगलेच घटले आहे. गेल्या काही दिवसांत वातावरणात अनेकदा झालेल्या बदलांमुळे बहुतांश मासेमारी नौका किनाऱ्यावरच नांगरून ठेवण्यात आल्या. ज्यावेळी वातावरण चांगले होते, त्यावेळी खोल समुद्रात जाऊनही मासे अत्यल्प प्रमाणात मिळाले. वातावरणातील बदलामुळेच मत्स्यसाठ्यांवर परिणाम झाला असण्याचीही शक्यता आहे. मासळीच्या निर्यातीवर परिणाममासे कमी प्रमाणात मिळत असल्याने ज्या नौका समुद्रात जातात, त्यांच्या खलाशांचा खर्चही भागत नाही. मासे मिळण्याचे प्रमाण कमी झाल्याने त्याचा परिणाम मासळीच्या निर्यातीवरही झालेला आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपयांचे परकीय चलन मिळवून देणारा मासेमारी व्यवसाय धोक्यात आला आहे.डिझेलचा खर्च, बर्फ, खलाशांचा पगार व भत्ता, जाळी व इंजिन दुरुस्ती यावर दररोज होणारा हजारो रुपये खर्च आणि मासळी विकून मिळणारे तुटपुंजे उत्पन्न याचा ताळमेळच लागत नसल्याने मच्छीमारांवर रडण्याची वेळ आली आहे. बँकेचे कर्ज तसेच व्यापाऱ्यांकडून आगाऊ रकमेची परतफेड होत नसल्याने मच्छीमारांची आर्थिक घडी विस्कटली आहे.

## नोट फॉर व्होट

असे अनेक प्रश्न यानिमित्ताने समोर आले आहे. अनेक ठिकाणी असे प्रकार घडले. प्रत्यक्षात मात्र स्थानिक पुढाऱ्यांनी यात मलिदा खाल्ला व मतदारांना पैसे न देताच चुना लावला. विधानसभा मतदारसंघाप्रमाणे हे पैसे वाटप करण्यात आले. स्थानिकांना प्रत्येकी ५०० रुपये, मुंबईकरांना १२०० रुपये तर बुथवर कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांसाठी २५ ते ५० हजार प्रति बूथ वाटप केल्याची चर्चा सोशल मिडियावर चांगलीच रंगली आहे. तरी या प्रकरणाची ईडी, सीबीआय, सीआयडी, राज्य आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करावी, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

## हिंदूंच्या संख्येत मोठी घट

हिंदूंच्या लोकसंख्येत ७.८ टक्क्यांनी घट झाल्याचेही स्पष्ट केले आहे. तर दुसऱ्या बाजूला भारताच्या शेजारील राष्ट्रांमध्ये त्या देशातील प्रमुख धर्मियांची लोकसंख्या वाढत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. शिवाय, यूपीएससीत मराठी यशवंतांचा टक्का घसरल्याचेही समोर आले आहे. अहवालानुसार, भारतात बौद्ध धर्मियांच्या संख्येत वाढ झाली आहे. दरम्यान, १९५० ते २०१५ या काळात मुस्लिमांची लोकसंख्या ४३.१५ टक्क्यांनी वाढ झाली, तर ख्रिश्चनांच्या लोकसंख्येत ५.३८ टक्क्यांनी वाढ झाल्याचा अहवाल आहे. शिवाय शीख धर्मियांच्या संख्येतही ६.५८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. १९५० साली भारतातील हिंदूंच्या लोकसंख्येचा वाटा ८४ टक्के होता. तो २०१५ साली ७८ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. तर मुस्लीमांचा १९५० मध्ये असलेला वाटा ९.८४ टक्के होता, तो मात्र, १४.०९ टक्क्यांवरती पोहोचला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आर्थिक सल्लागार समितीने जगभरातील १६७ देशांत १९५० ते २०१५ या कालावधीत लोकसंख्येत होत असलेल्या बदलांचा अभ्यास केला आहे.

## भाजपाला दोनशे पार जाणे कठीण : आदित्य ठाकरे

परंतु देशासमोर महागाई आणि बेरोजगारी हे दोन महत्त्वाचे मुद्दे असताना त्याबद्दल ते चकार शब्दही काढत नाहीत.पियुष गोयल यांनी केलेल्या आरोपांचा खरपूस समाचार घेताना आदित्य ठाकरे म्हणाले की दहा वर्षांनी का होईना परंतु पियुष गोयल यांना महाराष्ट्राची आठवण झाली हे आपले नशीबच समजायचे. त्यांच्याकडे अर्थ, रेल्वे अशी महत्त्वाची खाती होती परंतु त्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रासाठी काहीही केले नाही. आज देशातील रेल्वे स्थानकांची नावे बदलली जात आहेत परंतु परिस्थिती मात्र अजिबात बदललेली नाही. पियुष गोयल यांनी महाराष्ट्र हिताचे एखादे जरी काम केले असेल तरी ते मला सांगा. कोरोना काळामध्ये २३ मार्च रोजी परप्रांतातील मजदूरांना त्यांच्या घरी जाण्यासाठी रेल्वे गाड्या सुरू करा असा आम्ही आक्रोश करत होतो. तेव्हा या महाशयांना महाराष्ट्राकडे बघण्याची सवड नव्हती.महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरातला पळवून नेण्याच्या विषयावर देखील आदित्य ठाकरे यांनी भाजपा आणि मित्र पक्षांवर तोंडसुख घेतले. ते म्हणाले की अगदी जून २०२२ पर्यंत घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांना असं वाटत होतं की वेदांता फॉक्सकोन महाराष्ट्रातच राहील. त्यांनी एखाद्या ठेकेदाराप्रमाणे वक्तव्य केले होते. कारण त्यांच्या आजूबाजूला नेहमी ठेकेदार असतात. तळेगाव येथे होणारा हा प्रकल्प पुढे गुजरातला गेल्यानंतर तो देशाबाहेर निघून गेला.देशात सुरू असलेल्या हुकूमशाहीबद्दलदेखील त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की जेव्हा जेव्हा तुम्ही सत्य मांडायचा प्रयत्न करता तेव्हा तुमच्यावरती गुन्हे दाखल होतात. उद्या जर का तुम्ही भारतीय जनता पार्टीच्या विरोधात एखादी सत्यवादी बातमी लिहीलीत तर ही मंडळी पत्रकारांवर देखील गुन्हे दाखल करतील.

आदित्य ठाकरे यांची युवा पिढीमध्ये एक क्रेझ आहे. आदित्य ठाकरे यांच्या रोडशोला खारघर मध्ये न भूतो न भविष्यती असा प्रतिसाद लाभला. फार मोठ्या संख्येने नागरिक त्यांना अभिवादन करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. यामध्ये तरुणांची उपस्थिती लक्षणीय होती. माध्यमांशी संवाद साधताना आदित्य ठाकरे यांच्या समवेत शिवसेना उपनेते तथा आमदार सचिन भाऊ अहिर, जिल्हा संपर्कप्रमुख बबन दादा पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, काँग्रेस पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष सुदाम गोकुळ शेठ पाटील,शिवसेना पनवेल विधानसभा संपर्कप्रमुख वैभव सावंत, शिवसेना महिला आघाडी जिल्हा प्रमुख कल्पना पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

दि. १०/०५/२०२४

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल सौ.अरूणा सुभाष पाटील यानी खालील नमूद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालक शोभा लिलाधर पाटील यांचेसोबत झालेला आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्रफळ (आर.चौ.मी) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| आंबेपुर ता. अलिबाग | ५६/१/क | क्षेत्र ४-५८-०० | ४५.८० |

या मिळकतीपैकी लिहून देणार यांच्या हिश्यांतील क्षेत्र १-५०-०० आर. चौ. मी., सदर मिळकतीवर बांधलेले ग्रामपंचायत आंबेपूर हद्दीतील मालमत्ता क्र. ९५३/अ क्षेत्र ८१६ चौ. फुट आर. सी. सी. घर मिळकत व ९५३/ब क्षेत्र ३२० चौ. फुट आर. सी. सी. घर मिळकत व ९५३/क क्षेत्र ३२० चौ. फुट आर.सी.सी. या घर मिळकती या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
शोभा पाटील

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी, आंबेघर) पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं.९२७३२७३८४३/९६३७२७००१९

निवडक

## तरुणांचा अपघाती मृत्यू

**पनवेल :** जेएनपीटी ते पुणे जाणाऱ्या रोडवर पळस्पे फाटा पुलावर भरधाव मोटारसायकलची पुलाच्या कठड्याला धडक बसून झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. इमरान पठाण, रा. कोळखे पेठ हा त्याच्या ताब्यातील पल्सर मोटारसायकल क्रमांक एमएच ०६ बी वाय ८५१८ ही हायगयीने चालवून वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून पनवेलजवळील जेएनपीटी ते पुणे जाणाऱ्या रोडवर पळस्पे फाटा पुलावर भरधाव मोटारसायकलची पुलाच्या कठड्याला धडक दिली व अपघातात त्याचा मृत्यू झाला.

## कारचा अपहार, गुन्हा दाखल

**पनवेल :** काही दिवस वापरण्यासाठी दिलेल्या कारचा अपहार केल्याप्रकरणी कमलेश वरसाळे यांच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वाल्मीक भागवत गोपाळ हे कानपोली, हेदूटणे यांची कार (एमएच ४६ सीएच ७५९९) कमलेशला वापरण्यास दिली होती. काही दिवसांनी कमलेश वरसाळे यांच्यासोबत संपर्क झाला असता कार गहाण ठेवली असल्याची सांगितले. १७ लाखांची किया कंपनीची कार परस्पर गहाण ठेवून कारचा अपहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## 'एसटी बससेवा सुरू करा'

**अलिबाग :** अलिबाग-रोहा मार्गावर प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्यादेखील प्रचंड वाढू लागली आहे. अलिबाग व रोहा आगारातील एसटी बसेस या मार्गावरील प्रवाशांची ने-आण करतात. परंतु, वाढत्या प्रवासी संख्येमुळे एसटीची कमतरता दिवसेंदिवस जाणवू लागली आहे. नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सकाळी ८.३० च्या दरम्यान वावे-अलिबाग एसटी सुरू करावी, अशी मागणी होत आहे.

## बेशिस्त चालकांवर कारवाई

**अलिबाग :** वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५० चालकांविरोधात जिल्हा वाहतूक शाखेने मंगळवारी कारवाई केली. या कारवाईत त्यांच्याकडून ४८,८०० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला. वाहन वेगात चालवणे, वाहन परवाना नसणे, हेल्मेट नसणे अशा अनेक वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांना वाहतूक पोलिसांनी कारवाईचा दणका दिला. वाहन चालवताना नियमांचे पालन करूनच वाहन चालविण्याचे आवाहन यावेळी वाहतूक पोलिसांनी केले.

## अवैध दारू विक्रीवर छापा

**अलिबाग :** बेकायदेशीररित्या दारू विक्री करणाऱ्यांवर दादर सागरी पोलिसांनी रविवारी छापा टाकला. या छाप्यात २७६० रूपये किमतीचे विदेशी दारू जप्त करण्यात आली आहे. पेणमधील रामाची आळी या ठिकाणी राहत्या घराच्या मागील बाजूस दारू विक्रीचा धंदा राजरोसपणे सुरू असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली होती. त्यानुसार दुपारच्या दरम्यान सापळा रचून ही कारवाई केल्याची माहिती पोलीस हवालदार घरत यांनी दिली.

# आंबेनळी घाटातील जॅकेटधारी पूल धोकादायक

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

**गेल्या २३ जुलै २०२२ रोजी पोलादपूर शहराला नळपाणीपुरवठा करणाऱ्या जुन्या जॅकवेलला चोळई व सावित्रीच्या संगमावर जलसमाधी मिळाल्याने आता आंबेनळी घाटातील सर्वच कॉंक्रिटचे जॅकेट घालण्यात आलेल्या ब्रिटिशकालीन जीर्ण पुलांवर झाडं उगवल्याने धोक्याची घंटा वाजू लागली आहे. २०२१ मध्ये रायगड जिल्ह्यातील पोलादपूर ते प्रतापगड आणि पुढे सातारा जिल्ह्यातील प्रतापगड ते महाबळेश्वर असा रस्ता अतिवृष्टी आणि भूस्खलनाने बाधित झाल्यामुळे पोलादपूरच्या सार्वजनिक बांधकाम उपविभागाने ठेकेदारांचे उखळ पांढरे करून दिल्यानंतर आता कायमस्वरूपी उपाय करण्याऐवजी आगामी काही पावसाळे उखळ पांढरे करण्याचा धंदा कायम ठेवण्याचा विचार राजकीय इच्छाशक्तीच्या पाठिंब्यावर सार्वजनिक बांधकाम उपविभागाने कायम ठेवला आहे, असा आरोप करण्यात येत आहे.**


(छायाचित्र : शैलेश पालकर)

आंबेनळी घाटातील चार जीर्ण ब्रिटिशकालीन पुलांना गेल्या २०१६ मध्ये कॉंक्रिटचे जॅकीट घालण्याचे काम सार्वजनिक बांधकाम उपविभाग पोलादपूरने केले. यानंतर पहिल्याच पावसातच मोरगिरी फौजदारवाडी फाट्याजवळच्या पुलावरील रस्ता खचल्याने कामाचा दर्जा उघड झाला. मात्र, गेल्या वर्षभरात बांधलेल्या मोरीजवळील धबधब्याच्या पाण्यामुळे मोरीजवळचा रस्ता खचून वाहू लागला असून, घाटातील एकेरी वाहतूक आता केवळ छोट्या वाहनांसाठी सुरू आहे. परिणामी, आंबेनळी घाटातील जॅकीटधारी पुलांवरून तुरळक वाहतूक सुरू असल्यानेच हे पूल अद्याप शाबूत आहेत. या सर्व कामांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची गरज असून, सरकारचा सुमारे नऊ कोटींचा निधी या कामावर खर्च झाल्यामुळे लाभार्थींचे काय करायचे, असा प्रश्न विचारला जात आहे. याबाबतही स्वतंत्र चौकशी करून निर्णय घेण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

पोलादपूर-वाई-सुरूर राज्यमार्ग या रस्त्यावरील संरक्षण भिंत व रूंदीकरण, मोऱ्यांचे बांधकाम, मोठ्या मोरीचे बांधकाम, अभियांत्रिकी दुरूस्ती, अभियांत्रिकी सुधारणा, संरक्षण भिंत बांधणे अशी प्रत्येकी २० लाख रूपये खर्चाची सहा कामे करण्याचा डिसेंबर २०१५ मध्ये शुभारंभ आ. गोगावले यांच्या हस्ते करण्यात आला. तत्पूर्वी, पोलादपूर महाबळेश्वर रस्त्यावरील चार ब्रिटिशकालीन पुलांच्या कामांचीही तरतूद करण्यात आली होती. सदर सहा कामांची एकूण अंदाजे खर्चाची मंजुरी १.२० कोटी रूपयांची असल्याची माहिती तत्कालीन डेप्युटी इंजिनियर जाधव यांनी दिली होती. या कामांतर्गत पोलादपूरच्या चोळई आणि सावित्री नदीच्या संगमावरील लेप्रसी हॉस्पिटलजवळील पुलासाठी ६० लाख, मोरगिरी फौजदारवाडी फाट्याजवळील पुलासाठी ३५ लाख, कापडे बुद्रुक भवानवाडीजवळील पुलासाठी २६ लाख आणि आड-पायटे-कापडे खुर्द येथील पुलासाठी ४५ लाख अशा चार ब्रिटिशकालीन पुलांना कॉंक्रीटचे जॅकेट करण्यात आले आहे. या सुमारे दीडशेहून अधिक वर्षे जुन्या ब्रिटिशकालीन दगडी पुलांच्या खांबांच्या बांधकामांना अर्ध्या उंचीपर्यंत सिमेंट कॉंक्रीटची बंदिस्ती करण्यात येऊन या जॅकेटधारी पुलांची रूंदीदेखील वाढविण्यात आली आहे. मात्र, पुलाचे स्लॅब रूंद करताना ते मजबूत आहेत, अथवा कसे याबाबत कोणताही अभिप्राय सार्वजनिक बांधकाम उपविभाग पोलादपूरने दिलेला नाही. या सर्व कामांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची गरज असून, सरकारचा सुमारे ९ कोटींचा निधी या कामावर खर्च झाल्यानंतरही भर पावसाळ्यात केवळ दरडग्रस्त असल्याचे कारण पुढे करून रहदारीमुक्त करीत चारही पुलांच्या जॅकेट बांधकामाला अनोखी सुरक्षा प्रदान करणाऱ्या लाभार्थींचे काय करायचे, याबाबतही स्वतंत्र चौकशी करून निर्णय घेण्याची आवश्यकता व्यक्त होते आहे.

पोलादपूर ते प्रतापगड आणि पुढे महाबळेश्वरपर्यंतचा आंबेनळी घाट ठिकठिकाणी दरडग्रस्त झाल्यानंतर पोलादपूर ते प्रतापगडदरम्यान सिमेंट कॉंक्रीटचे जॅकेट घालून आजमितीस उभे असलेल्या जीर्ण ब्रिटिशकालीन पुलांना महाड एमआयडीसीजवळच्या सावित्री नदीवरील पुलाप्रमाणे अचानक जलसमाधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पोलादपूर-वाई- सुरूर राज्यमार्गावरील गेल्या १२ वर्षांत झालेल्या सर्व कामांची दर्जा व गुणवत्ता नियंत्रण विभागाच्या अभियंत्यांकडून निष्पक्षपणे चौकशी करण्याची गरज असून, सातारा जिल्ह्यामध्ये या रस्त्याचे रूंदीकरण करण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे.



## शीतपेयांना वाढती मागणी

**। कोलाड । वार्ताहर ।**

दिवसेंदिवस तापमानात वाढ होताना दिसत असून, तापमानाचा पारा ४० अंशांपेक्षा वर गेला असल्यामुळे वाढत्या उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले असून, यामुळे ज्यूस, ताक, लस्सी आदी शीतपेयांना नागरिक जास्त पसंती देत आहेत. त्यामुळे यांची मागणी वाढली आहे.

वाढते प्रदूषण व सतत होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासाने रानेवने ओस पडू लागली असून, रोहा तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात दिवसेंदिवस उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. यामुळे वाढत्या तापमाणामुळे नागरिक हैराण झाले असून, शरीराचा दाह कमी करण्यासाठी विविध शीतपेय, ज्यूस, ताक, लस्सी याकडे लोकांचा कल वाढताना दिसत आहे.

आताच उष्णतेचा पारा ४० अंशांच्या वर गेल्याने सकाळी दहा वाजल्यापासून उन्हाचे चटके बसत आहेत. भरमसाठ वृक्षतोड त्याचबरोबर लावले जाणारे वनवे यामुळे जनसंपदा नष्ट होत चालली आहे. परिणामी, परिसर व रस्ते आग ओकताना दिसत आहेत. या सर्व दाहक परिस्थितीपासून बचाव करण्यासाठी नागरिक थंडगार शीतपेय, ताक, लस्सी, लिंबू सरबत, कोकम सरबत, उसाचा रस याचा आधार घेताना दिसत आहेत.

# शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्याविरोधात वीजचोरीचा गुन्हा दाखल

**। पनवेल । वार्ताहर ।**

तालुक्यातील वावंजा गावात महावितरण कंपनीच्या वाशी येथील भरारी पथकाने केलेल्या कारवाईत वीजचोरीचे मोठे प्रकरण उघडकीस आले आहे. याबद्दल वीज विभागाचे सहाय्यक अभियंता कपिल गाठले यांनी बुधवारी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दिलेल्या तक्रारीनुसार वावंजा गावातील परेश पाटील आणि त्यांच्या पत्नीने ३० हजारांपेक्षा जास्तीच्या वीज युनिटची चोरी केल्याची तक्रार पोलिसांना दिली. परेश पाटील हे शिवसेना शिंदे गटाचे पनवेल ग्रामीणचे वरिष्ठ पदाधिकारी आहेत.

वावंजा गावातील घर क्रमांक १४२२ येथे पाटील दाम्पत्य राहात असून, ऑक्टोबर २०२२ ते एप्रिल २०२४ या दरम्यान १९ महिन्यांमध्ये ३०,८२२३ वीज युनिटची चोरी केल्याचे भरारी पथकाच्या निदर्शनास आल्याने परेश पाटील व त्यांच्या पत्नीविरोधात १० लाख २५ हजार ९२२ रुपयांची वीजचोरी केल्याबाबत भारतीय विद्युत कायदा कलम २००३ चे कलम १३५ प्रमाणे गुन्हा नोंदविला आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्यात सहाय्यक अभियंता कपिल गाठले यांनी तक्रार दिल्यावर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात हा गुन्हा पुढील तपासासाठी वर्ग करण्यात आल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र घेवडेकर यांनी दिली. परेश पाटील हे तत्कालिन पनवेल पंचायत समितीचे सदस्य होते.

शेकाप व शिवसेनेच्या युतीमध्ये त्यांना जिल्हा परिषदेवर काम करण्याची संधी मिळाली होती. सध्या ते शिंदे गटाच्या शिवसेनेचे ग्रामीण पनवेलचे पदाधिकारी आहेत. विशेष म्हणजे, वावंजा गावात यापूर्वीही वीजचोरी होत असतानासुद्धा महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पकडले आहे.

## २१ लाख ८३ हजारांची फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

ट्रेंडिंग केली तर त्याचा चांगला फायदा होईल असे सांगून २१ लाख ८३ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मच्छिंद्रनाथ मुरलीधर गोरे हे बालाजी सिम्फनी, सुकापूर येथे राहतात. ते फेसबुक पाहात असताना शेअर मार्केट लीडर ९२ हे पेज त्यांनी क्लिक केले. त्यावेळी त्यांनी त्यांची माहिती सबमिट केली. त्यावेळी व्हॉट्सअप ग्रुपची रिक्वेस्ट आली. ती त्यांनी स्वीकारली. त्यानंतर त्यांना ट्रेडिंगसंदर्भात माहिती देण्यात आली व ग्रुपमधील सदस्यांचे रात्री ऑनलाईन लेक्चर घेऊन त्यामध्ये शेअर मार्केटची माहिती दिली.

# रस्त्यावरील खडी साफ; धोका टळला

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठणे-वेलशेत फाटामार्गे रोह्याकडे जाणाऱ्या जेएसडब्ल्यू कंपनीच्यामालवाहूडंपरमधूनपडलेली खडी साफ करण्याची कार्यतत्परता नागोठणे पोलिसांनी दाखविली आहे. बुधवार, दि. ८ मे रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास अज्ञात वाहनातून भाएसो शैक्षणिक संकुल ते वरवठणे गावापर्यंतच्या रस्त्यावर पडलेली खडी मजुरांच्या सहाय्याने साफ केल्याने संभाव्य अपघात टळले. त्यामुळे नागोठणे पोलिसांनी दाखविलेल्या कार्यतत्परतेचे कौतुक होत आहे.



वेलशेत फाटा येथील भाएसो शैक्षणिक संकुल ते वरवठणे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर खडी पडल्याची व त्यावरून मोटारसायकलस्वार घसरत असून, यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता असल्याची माहिती वरवठणे गावातील किशोर म्हात्रे यांनी नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश काळसेकर यांना दिली. काळसेकर यांनी त्वरित नागोठणे पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेले पोलीस हवालदार एम.के. रुईकर यांना या घटनेची माहिती देऊन तात्काळ घटनास्थळी जाण्यास सांगितले. रुईकर यांनीही त्वरित घटनास्थळी जाऊन काही स्थानिक कामगारांना बोलवून रस्त्यावरील खडी झाडूच्या सहाय्याने साफ करुन रस्ता वाहतुकीसाठी पूर्ववत केला. त्यामुळे वाहनांचा विशेष करून मोटारसायकलस्वारांचा या खडीवरून घसरून अपघात घडण्याचा धोका टळला.

> **जेएसडब्ल्यू कंपनीची खडीची नियमबाह्य वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे काम आमच्या कर्मचाऱ्यांकडून सुरु करण्यात आले आहे. तसेच यासंदर्भात जेएसडब्ल्यू प्रशासनालाही लेखी आदेश पारित करण्यात आले असून, यासंदर्भात सर्व संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.**
> **– महेश देवकाते, पेण प्रादेशिक**

याआधीही नागोठणे-रोहा मार्गावर धाटाव येथील कंपनीत जाणाऱ्या एका टँकरमधून रस्त्यावर तेलगळती झाल्याने त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे काम नागोठण्याचे सपोनि हरेश काळसेकर व त्यांच्या टीमने केल्याने त्यावेळीही संभाव्य अपघात टळले होते.

## फेसबुकवरील मैत्री शिक्षिकेला महागात

**। पनवेल । वार्ताहर ।**

फेसबुक या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अनोळखी व्यक्तीशी मैत्री करणे पनवेलमधील एका शिक्षिकेला महागात पडले. या भामट्याने आधी शिक्षिकेशी मैत्री करून तिला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तिची ३० लाख ९६ हजार ८६५ रुपयांची फसवणूक केली.

फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शिक्षिकेने सायबर सेलकडे तक्रार दाखल केली. पोलीस ठाण्यामध्ये दाखल केलेल्या तक्रारीनुसार, मार्च २०२४ मध्ये डॉक्टर फेलेसिया प्रिन्स नावाच्या व्यक्तीने महिला शिक्षिकेला फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली होती, जी तिने स्वीकारली. यानंतर भामट्याने गिफ्ट पाठवण्यास सांगितले.

# पावसाळ्यापूर्वीच्या कामांना सुरुवात

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीमध्ये नगरपंचायततर्फे नालेसफाईच्या कामांना सुरुवात झाली आहे. पावसाळ्यापूर्वी ही सर्व कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. परिणामी पावसाळ्यात गटारे व नाले तुंबण्याचा धोका नाही.



पालीतील श्री बल्लाळेश्वर मंदिरापासून नालेसफाईला सुरुवात झालेली आहे. ठरलेल्या नियोजनाद्वारे येथील वेगवेगळ्या ठिकाणची नालेसफाई टप्प्या-टप्प्याने पूर्ण करण्यात येईल. नुकतेच लोकसभेची निवडणूक झाल्याने आता नालेसफाईच्या कामांना वेग आला आहे. पाणी बॉटल, प्लॅस्टिकच्या पिशव्या, घरगुती कचरा व गाळ यामुळे येथील बहुसंख्य ठिकठिकाणी नाले व गटारे तुंबली आहेत. नगरपंचायत चे सफाई कर्मचारी नियमित नालेसफाई करतात. पावसाळ्यापूर्वी होत असलेली नालेसफाई ही अत्याधुनिक यंत्र व जेसीबीच्या साह्याने अधिकची माणसे घेऊन करण्यात येत आहे. त्यामुळे या तुंबलेली गटारे व नाले पूर्णपणे साफ होती. तसेच नालेसफाई सुरुवात झाल्याने दुर्गंधी व घाण सर्व समस्या काही दिवसांत मार्गी लागणार आहेत. नगरपंचायतीद्वारे कंत्राटी कामगार घेऊन नालेसफाई केली जात आहे.

> **अनेक ठिकाणचे नाले व गटारांची कामे पूर्ण केली आहेत. तसेच मेअखेर किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत नगरपंचायत हद्दीतील नालेसफाईची कामे पूर्ण होतील. नालेसफाईची कामे चांगली व वेळेत व्हावीत यासाठी स्वतः लक्ष देत आहे. तसेच स्वच्छता सभापती व नगरसेवक देखील या कामांवर लक्ष ठेऊन आहेत. नागरिकांनी आवाहन आहे की त्यांनी प्लास्टिक बॉटल, पिशव्या व घरातील कचरा गटारे किंवा नाल्यात टाकू नये.**
> **– प्रणाली शेळके, नगराध्यक्षा, पाली**

# विरूपाक्ष महादेव मंदिरात लक्ष पुष्प अर्चन सोहळा

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल येथील प्राचीन श्री विरूपाक्ष महादेव मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण झाल्याला २१ वर्षे पूर्ण झाली. जीर्णोद्धाराच्या २१ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने पनवेलमधील पत्रकार बांधव आणि विविध मंदिरांच्या न्यासाचे प्रतिनिधी यांच्या हस्ते लक्ष पुष्प अर्चन सोहळा आयोजित करण्यात आला होता. देवस्थान विश्वस्त व सेवा समूह यांच्या वतीने परमोच्च प्रसन्नतेची अनुभूती देणारा हा सोहळा न भूतो न भविष्यती असा पार पडला. सकाळी मान्यवरांच्या हस्ते शंभू महादेवाच्या पिंडीवर अभिषेक संपन्न झाला. त्यानंतर विधिवत पूजा करण्यात आली. यानंतर गाभाऱ्यामध्ये १२ विविध प्रकारची पुष्पे अर्पण करून लक्ष पुष्प अर्चन सोहळा पार पडला. प्रसाद कर्वे गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली शंभू महादेवाचे नाम उच्चारण झाल्यावर अर्चन सोहळ्यासाठी बसलेले मान्यवर पुष्पाणी समर्पयामी असे म्हणत फुले अर्पण करत होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **विहिरी - आपल्या शेतीवाडी बंगल्यात पाण्याच्या सोयीसाठी सिमेंट कॉंक्रीट रिंगाचे विहीर करून घेण्यासाठी व नळाचे पाणी साठविण्यासाठी पाण्याची टाकीसाठी संपर्क रणजित पाटील-अलिबाग फोन- ९८३४३०३९४१/९८८१६३७०४७**
- **अलिबाग-चोंढी येथील रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत.** Receptions-Housekeeping-waiter-Helper-Cook etc. संपर्क- 8208459424/9323152990 Email. csskshrisnkar@gmail.com
- **'इंद्रप्रस्थ' गोंधळपाडा येथे सफाईकामगार त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण-इंद्रप्रस्थ, गांवदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क - ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४**
- **शिवाजी नगर चेंढरे येथे ६.७० गुंठे बिनशेती प्लॉट इमारतीकरिता विकणे आहे. संपर्क ९२२६८४७०७७**
- Accountant **पाहिजे २-३ वर्षांचा अनुभव पगार- २०,०००/- महिना ठिकाण-बामणसुरे, चोंढी** contact-9823585321
- **नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. १. वेटर २. रिसेप्शन ३. हॉटेल मॅनेजर २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसअॅप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५**
- **फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/नापास ८ तास ड्युटी, ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना.** Contact- ९०४९६५५५२३.
- **विद्यानगर, चेंढरे येथे 2BHK टेरेस फ्लॅट विकणे आहे.** क्षेत्र- १२०० Sqft. संपर्क : PROLOAN SOLUTION ९२२१६८०२८४/९७६४१४९१४३

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# मोबाईलच्या जमान्यात मामाचे गाव हरवले

**। पेण । प्रतिनिधी ।**

**लहान मुलांकडून पालकांच्या वाढलेल्या अपेक्षा, शैक्षणिक बदलामुळे उन्हाळ्याचय सुट्टीतही घेतल्या जाणाऱ्या परीक्षा तसेच युवा पिढीला मोबाईल, कॉम्प्युटर व सोशल मीडियाचे लागलेले व्यसन यामुळे उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाचे गाव हरवत चालले असून, जुने पारंपरिक खेळी हद्दपार होत असल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात दिसून येत आहेत.**



### मुले कार्टून बघण्यात व्यस्त

**लहान मुले मैदानी खेळ खेळण्यापेक्षा घरी टीव्हीवरील छोटा भीम, मोठु-पतलु आदी कार्टून बघण्यात व्यस्त असल्याचे दिसतात. मुलांना पारंपरिक खेळाकडे वळवणे गरजेचे आहे. मोबाईल, कॉम्प्युटर यामुळे मुलांची कार्यक्षमता कमी होत चालली आहे. त्यामुळे पालकांनी मुलांना मैदानी खेळ खेळण्यास प्रवृत्त करणे ही काळाची गरज आहे.**

आज मोबाईलच्या युगामध्ये उन्हाळयाची सुट्टी पडली की, मामाच्या गावाला जायची ओढच राहिलेली नाही. त्यातच वेगवेगळ्या शैक्षणिक बोर्डाचे वेगवेगळे नियम यामुळे बच्चे कंपनीला सुट्टी अनुभवताच येत नाही. एक काळ असा होता की, एप्रिल महिन्यामध्ये परीक्षा संपतात कधी आणि शहराकडील मंडळी गावाकडे जातात कधी आणि गावाकडची असतील तर मामाकडे जायला आतुरच असायची. आज धावपळीच्या युगामध्ये मामाच शहरात येऊन राहिल्याने मामाकडे जाण्याचा प्रश्नच येत नाही. आणि कोकणी माणसाचा विचार केला तर धो-धो पाऊस पडतो. परंतू, उन्हाळ्याच्या सुट्टीच्या वेळेला ग्रामीण भागामध्ये पाणीटंचाईच्या मोठ्या झळा सोसाव्या लागतात, त्यामुळे मामादेखील गावाला जाण्याच्या फंदात पडत नाही.

> मामाच्या गावाला जाऊन घराच्या समोरील अंगणात गोट्या, भवरे, सापशिडी, पत्ते, लंगडी, लपाछपी, आंधळी कोशिंबीर यांसारखे खेळ खेळले जात. ते आता फक्त आठवणींपुरते मर्यादित राहिले आहेत. पूर्वीसारखे घरासमोर असणारे मातीचे अंगण आता फारसे पहायला मिळत नाहीत.
> - स्वप्निल म्हात्रे, पालक

मामाचं पत्र हरवलं अशा प्रकारचा खेळ बालपणी खेळला जायचा. पण आता मामाचे पत्र तर हरवलेच आहे. कारण आज तंत्रज्ञाच्या युगात पत्र काय असतं हे मुलांना माहीतच नाही. कारण मोबाईलच्या स्क्रीनमध्ये मुलं एवढी गुरफटलीत की, त्यामध्ये मामाचं पत्र पूर्णतः हरवूनच गेले आहे. शिवाय, उन्हाळ्याची सुट्टी पडली पण मामाच्या गावाला न जाता आता याच सुट्टीत जादा क्लासेस, व्हेकेशन क्लासेस, कॉम्प्युटर क्लासेस यांसह साहस शिबीर, समर कॅम्प यांसारखे उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले असल्याने बरेच पालक आपल्या मुलांना उन्हाळी सुट्टीत मामाच्या गावाला पाठवण्याऐवजी अशा प्रकारच्या शैक्षणिक आणि बौध्दिक, साहसी शिबिरात पाठवणे पसंत करत आहेत.

बालपणी लहान मुलांना वार्षिक परीक्षा कधी संपते आणि कधी एकदा मामाच्या गावाला जातोय अशा प्रकारची ओढ लागायची. मामाच्या गावाला जाऊन विविध प्रकारचे खेळ खेळणे, मौजमस्ती करणे आणि त्यातच जर मामाचे गाव ग्रामीण भागात असेल, तर आंबे, करवंदे, जांभळं, रांजण, हटोरणं आदी प्रकारची उन्हाळ्यात येणारी फळे झाडावर चढून किंवा झाडावरुन पाडून खायची मज्जाच काही वेगळी होती. मात्र, आता दिवसेंदिवस होत चाललेले बदल, वाढते शहरीकरण, यामुळे कमी होत चाललेल्या शेती, वाड्या, फळबागा यामुळे मामाच्या गावाला जाऊन ती मजा करण्याचे दिवस हळूहळू कमी होत चालल्याने अनेक पालक आपल्या मुलांना उन्हाळी सुट्टीतील विविध उपक्रमांमध्ये गुंतून ठेवत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

# पालीत पावसाळ्यापूर्वीच्या कामांना वेग

**। पाली । वार्ताहर ।**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीमध्ये नगरपंचायततर्फे नालेसफाईच्या कामांना सुरुवात झाली आहे. पावसाळ्यापूर्वी ही सर्व कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. परिणामी पावसाळ्यात गटारे व नाले तुंबण्याचा धोका राहणार नाही.

पालीतील श्री बल्लाळेश्वर मंदिरापासून नालेसफाईला सुरुवात झालेली आहे. ठरलेल्या नियोजनाच्या द्वारे येथील वेगवेगळ्या ठिकाणची नाले सफाई टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येईल. नुकतेच लोकसभेची निवडणूक झाल्याने आता नालेसफाईच्या कामांना वेग आला आहे. पाणी बॉटल, प्लॅस्टिकच्या पिशव्या, घरगुती कचरा व गाळ यामुळे येथील बहुसंख्य ठिकठिकाणी नाले व गटारे तुंबली आहेत. नगरपंचायत चे सफाई कर्मचारी नियमित नालेसफाई करतात. पावसाळ्यापूर्वी होत असलेली नालेसफाई ही अत्याधुनिक यंत्र व जेसीबीच्या साह्याने अधिकची माणसे घेऊन करण्यात येत आहे. त्यामुळे या तुंबलेली गटारे व नाले पूर्णपणे साफ होती. तसेच नालेसफाई सुरुवात झाल्याने दुर्गंधी व घाण सर्व समस्या काही दिवसांत मार्गी लागणार आहेत.

नगरपंचायतद्वारे कंत्राटी कामगार घेऊन नालेसफाई केली जात आहे. गटारे व नाल्यातील घाण, कचरा काढला जात आहे. याबरोबरच गटारे व नाल्याभोवती उगवलेले गवत, झाडे झुडपे देखील काढली जात आहेत.

> अनेक ठिकाणचे नाले व गटारे यांची कामे पूर्ण केली आहेत. तसेच मे अखेर किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत नगरपंचायत हद्दीतील नालेसफाईची कामे पूर्ण होतील. नालेसफाईची कामे चांगली व वेळेत व्हावीत यासाठी स्वतः लक्ष देत आहे. तसेच स्वच्छता सभापती व नगरसेवक देखील या कामांवर लक्ष ठेऊन आहेत. नागरिकांना आवाहन आहे की त्यांनी प्लास्टिक बॉटल, पिशव्या व घरातील कचरा गटारे किंवा नाल्यात टाकू नये.
> – प्रणाली सूरज शेळके, नगराध्यक्षा, पाली नगरपंचायत

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री रमणेश मदन पुरी रा. मांटुगा मुंबई ४०००१९ यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे मार्केवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ६/४ एकुण ०.७४.६० पैकी २० गुंठे, जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १०/०५/२०२४

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

---

प्रोसेस जमा
दि. ११/७/२०२४

अर्जदारातर्फे वकिल
ॲड. तनुष्का पेंडणेकर

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्याय. व. स्तर सो. यांचे कोर्टात**

दि.चौ.अर्ज नं. २२६/२०२३
नि.नं.

श्रीमती. सुनंदा केशव म्हात्रे — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांचे पती कै. केशव शंकर म्हात्रे हे दि. १३/१०/२०१६ रोजी मौजे मोठे शहापूर, ता. अलिबाग, जि. रायगड येथे मयत झाले आहेत तसेच त्यांचे मृत्युसमयी व त्यांचे मृत्युपश्चात त्यांस अर्जदार व मुलगा जगदीश केशव म्हात्रे हे कायदेशीर वारसदार होते परंतु मुलगा कै. जगदीश केशव म्हात्रे हा दिनांक १२/०५/२०२२ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार यांचे पती कै. केशव शंकर म्हात्रे यांनी भारतीय भारतीय स्टेट बँक शाखा पोयनाड अंकाउंट नं. ३५६३६५६६४८५ असे कै. मुलगा जगदीश केशव म्हात्रे व कै. केशव शंकर म्हात्रे जॉईंट अकाउंट आहे. यांचे मृत्युपश्चात अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. त्याशिवाय मयतास अन्य कोणीही वारस नाहीत. म्हणुन मे. कोर्टात अर्जदार ह्यांनी अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना कै. केशव शंकर म्हात्रे व मुलगा कै. जगदीश केशव म्हात्रे यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दि ११/०७/२०२४ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे ते कै. केशव शंकर म्हात्रे व मुलगा कै. जगदीश केशव म्हात्रे यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यांत येवून मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देणेचा हुकूम अर्जदार यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि.१०/०५/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
**कनिष्ठ लिपीक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायाधिश**
**दिवाणी न्यायालय व. स्तर अलिबाग**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बामणगांव ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रविण रमाकांत कवळे व श्री. संदिप रमाकांत कवळे दोघे रा. मु, ६०३, लयबर्मन महिंद्रा गार्डन एस.बी. रोड गोरेगांव वेस्ट मुंबई- ४०० १०४ यांच्या नांवे असलेल्या सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकती माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र | मौजे | भुमापन क. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १. | बामणगाव ता.अलिबाग जि.रायगड | ४११/२ | ०-२२-१० पो.ख. ०-०६-९० एकुण क्षेत्र ०-२९-०० | ४.४९ |
| २. | बामणगाव ता.अलिबाग जि. रायगड | ४१४/२ | ०-१९-५० पो.ख. ०-०१-५० एकुण क्षेत्र ०-२०-५० | ३.५६ |
| ३. | बामणगाव ता.अलिबाग जि.रायगड | ४१४/१ | ०-१४-६० पो.ख. ०-०१-२० एकुण क्षेत्र ०-१५-८० | २.७३ |

सदर मिळकती निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकती निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :-१०/०५/२०२४ — सही/-

**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निंबधक अलिबाग कार्यालया समोर गाळा क्र.३, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे मोठे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे मोठे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| गणेश विठ्ठल मुंढे श्वेता गणेश मुंढे | ८८ | ४/अ | ०-२९-०० | ४.९७ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : १०/०५/२०२४

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को. ऑप. हौ. सोसायटी, शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ८८८८०९८०८८/९५६१५७५६२६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल श्री. १. संतोष प्रभाकर म्हात्रे वगैरे, रा.मु. पो. किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या वडिलोपार्जित मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत असून सदर मिळकतीबाबत आम्ही श्री. शैलेश कमलाकर म्हात्रे व ईतर यांचेविरूद्ध दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांच्याकडे यांनी नियमित दिवाणी दावा क्र. १७६/२००८ चा दावा दाखल केलेला आहे व त्यानंतर दिवाणी चौकशी अर्ज क्र. १३८/२०२३ हा देखिल दाखल केलेला आहे. सदर मिळकतीच्या ७/१२ दप्तरी श्री. शैलेश कमलाकर म्हात्रे व ईतर यांचे नाव असल्याचा गैरफायदा घेवून सदर खालील नमुद केलेल्या मिळकती हया ईतर ईसमांना विकण्याच्या तयारीत आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| किहीम, ता. अलिबाग | ४३५ | २-५३-० | १४-४४ |

तरी मिळकतीसंदर्भात सदर दाव्यांतील प्रतिवादी क्र. १/२ शैलेश कमलाकर म्हात्रे हे सदर मिळकत त्रयस्थ ईसमांस विकणेचे तयारीत आहे तसा कुठलाही व्यवहार सदरचा दावा प्रलंबित असताना आमचे अशिलांचे अपरोक्ष केल्यास व आमचे अशिलांचे हक्कास कमीपणा येईल असा व्यवहार केल्यास त्या व्यवहारास आमच्या अशिलांची सक्त हरकत असेल. व तसे केल्यास सदर व्यक्ती सदर मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार (Bonafide Purchaser) होणार नाहीत. तसेच अशा प्रकारचा कोणताही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. तरी कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्यास भविष्यातील कोर्ट कारवाईस संबंधीत ईसम जबाबदार राहतील हे कळावे.

अलिबाग,
दि. ०९-०५-२०२४. — सही/-

**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु बिल्डींग, राम मंदिर शेजारी
ब्राम्हणआळी अलिबाग

## जाहीर नोटिस

याद्वारे तमाम जनतेला नोटिस देण्यात येत आहे की, आमचे अशील इच्छुक असल्याने आम्ही १) श्री. सुबोध मनोहर महाडिक २) सौ. रश्मी सुबोध महाडिक ३) श्री. सूरज सुबोध महाडिक आणि ४) श्री. अश्विन सुबोध महाडिक (मालक) यांच्या मालमत्तेची विषेशतः खाली दिलेल्या परिशिष्ट मध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेची चौकशी करत आहोत. गाव-अडी ता. मुरुड, जिल्हा -रायगड, मधील भुमापन क्रमांक व उपविभाग ७९/२ (जुना सर्वे नंबर १०/३) वरकस. ०४.७०.०० (हे.आर.चौ.मी.) पो.ख. ००-००-००(हे.आर.चौ.मी.) एकूण क्षेत्र ०४-७०-०० (हे.आर.चौ.मी.), आकार ०३. रु ८२ पैसे. पैकी क्षेत्र ०३.७०.०० हे. आर. चौ.मी. आकार ०३.०१ रु. पैसे. १) दीपक कल्याणजी तन्ना २) आरती तन्ना भाकले (सध्याची) आरती कल्याणजी तन्ना (पूर्वाश्रमीची) यांचे कडून नोंदणीकृत खरेदीखत क्रं. म.र.र./४१/२०२४ दिनांक १९/०१/२०२४ अन्वये खरेदी घेतली आहे.

या मालमत्तेबाबत विक्री/साठेकरार, देवाणघेवाण, भाडेपट्टे, भाडेकरू, परवाना, ट्रस्ट या मार्गाने किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या विरोधात/वर/ संबंधात /विरुध्द/दावा, अपील/वर/आक्षेप, हक्क, हित, हक्क, मागणी आणि/किंवा आक्षेप असलेली सर्व किंवा कोणतीही व्यक्ती वा संस्था, धारणाधिकार, देखभाल सुलभता, वारसा, ताबा, संलग्न, गहाण, शुल्क, साठेकरार, खरेदी व्यवहार, अतिक्रमण, मृत्युपत्र, भेट, लिस-पेंडन्स, वहिवाट, एफ. एस. आय. वापर किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाची हर हरकत असल्यास त्याची लेखी सूचना खालील पत्तावर देण्याची विनंती केली आहे. माहेरनोश जे. हुमरनवाला ॲडव्होकेट आणि सॉलिसिटर, भागीदार, तत्व लीगल, मुंबई, पहिला मजला, जन्मभूमी भवन, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ अशा हक्क, शीर्षक, व्याज, दावा, मागणी आणि किंवा आक्षेपांच्या समर्थनार्थ कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत आम्हाला द्यावी, असे न झाल्यास असा कोणताही दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नाही असे गृहीत धरले जाईल आणि जरी असा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असला तरीही, असे मानले जाईल की दावेदाराने असा दावा मागणी किंवा आक्षेप सोडला आहे आणि/किंवा असा दावा, मागणी किंवा आक्षेप वापरण्याचा कोणताही अधिकार सोडला आहे आणि मुदती नंतर आलेले कोणतेही आक्षेप आमच्या अशील यांचेवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर विचार केल्याप्रमाणे खरेदी व्यवहारात पुढे जाऊ शकतात.

**परिशिष्ट**
**(मालमत्तेचे वर्णन)**

गाव-अडी ता. मुरुड, जिल्हा-रायगड, मधील भुमापन क्रमांक व उपविभाग-७९/२ (जुना सर्वे नंबर १०/३) वरकस. ०४.७०.०० (हे.आर.चौ.मी.) पो.ख. ००-००-००(हे.आर.चौ.मी.) एकूण क्षेत्र ०४-७०-००(हे.आर.चौ.मी.), आकार ०३. रु ८२ पैसे. पैकी वरील व्यक्ति यांचे नावे असणारे क्षेत्र ०३.७०.०० हे. आर. चौ.मी. आकार ०३.०१ रु. पैसे क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक १०/०५/२०२४

**तत्व लीगल, मुंबई तर्फे भागीदार**
**अँड. माहेरनोश जे. हुमरनवाला**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-थळ, ता. अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची बिनशेती मिळकत शुभांगी केदारनाथ पिसाट यांच्या मालकीची असून सदरील बिनशेती मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| थळ, ता.अलिबाग | २९०/५ | ०३-८०-०० | ०.७५ |

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेंनन्स, मेहेर, कर्ज वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तीनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांका पासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : /०५/२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु. नांदाईपाडा, पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड मो.नं. ९८२२१८६७४०

# दिनकर पाटील यांचे निधन



**रसायनी :** भाताण येथील पत्रकार सुनील पाटील यांचे वडील दिनकर महादू पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते. काही दिवस ते उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते अखेर त्यांची प्राणज्योत मावळली. दिनकर पाटील हे मनमिळावू स्वभावाचे होते.त्यांनी पाताळगंगा येथील रिलायन्स कंपनीत सोसायटी कामगार म्हणून २५ वर्षे सेवा बजावली. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.भाताण येथील स्मशानभूमीवर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे दशक्रिया विधी गुरुवारी (दि.१६) होणार असून उत्तरकार्य सोमवारी (दि. २०) भाताण येथील राहत्या घरी होणार आहे.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की १ श्री. प्रभाकर गोविंद पाटील, २.प्रतिभा प्रभाकर पाटील, ३. रुचिर प्रभाकर पाटील, ४.सुकेश प्रभाकर पाटील यांचेकडून आमचे अशिल यांनी खालील बिनशेती वर्णनाची मिळकत विकत घेण्याचे ठरविले असून त्याबाबत बयाणापावती केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमाक व उपविभाग | बिनशेती प्लॉट नं | क्षेत्र | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|---|
| ढवर | ५८४/१ | ४ | ३१० चौ.मी | ३१.०० |
| ढवर | ५८४/१ | ५ | ३१० चौ.मी | ३१.०० |

तरी वरील बिनशेती जमिन मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवासांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १०/०५/२०२४

सही
**ॲड. सौ. गौरी गिरीश म्हात्रे**
डी - २ हिराबाग सगुण हॉटेलच्या वर जिल्हा न्यायालयासमोर
अलिबाग- रायगड मो नं. ९२७१७७५२७७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-आवास, ता. अलिबाग येथील १) गट नं. ७७०, एकूण क्षेत्र ०- २९-६० हे.आर., आकार ६.२० रू.पै. २) गट नं. ७७६, एकूण क्षेत्र ०-१०-२० हे. आर., आकार ०.६८ रू.पै. या जमीन मिळकती तसेच मौजे आवास गट नं. ७७० या जमीन मिळकतीवरील ग्रुप ग्रामपंचायत आवास हद्दीतील मालमत्ता नं. १०९, क्षेत्र ३४६.२२ चौ. मीटर घर मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्राणेश पुरणमल केजरीवाल रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०९/०५/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक यांनी त्यांचे स्वकष्टार्जित मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील शेतजमिन मिळकत आमचे अशिल यांना कायमस्वरुपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांबरोबर केलेली आहेत. मौजे रजपे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड ४१०२०१ येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

| शेतजमिन मालकाचे नाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | शेतजमिनीचे क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.आ. |
|---|---|---|---|
| रोहित चंद्रकांत हजारे समिर पंढरीनाथ गोमारे | ४३ | ०-२१-५० | ०.७६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, खरेदीखत, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे मनाईहुकूम, करारनामा व इतर हितसंबंध हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमूद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

तारीख : १०-०५-२०२४ — सही/-

**ॲड. जगदीश पांडुरंग कराळे**
कार्यालय :१०, पंकज रेसिडेन्सी, साई हॉस्पिटल जवळ, धामोते, नेरळ, ता. कर्जत
जि. रायगड ४१०१०१, मो.नं.८३६९२१७३१३

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक अरविंद तुकाराम घरत व जितेंद्र अनंत लेले यांच्या खुद्द मालकीची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | पोट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| नागांव ता. अलिबाग | २४१२ | - | ०-०४-५० | २.२५ |

वर नमूद बागायत मिळकत व या मिळकतीमधील शेतघर मिळकत यासह

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १०/०५/२०२४
अशिलाची सही — सही/-

**ॲड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री नारायण भाऊ औंटी व श्री शिवाजी भिमाजी चौधरी रा.खारघर नवी मुंबई ४१०२०१ याच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे सालवड, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ६०/१ एकुण १.९६.०० गुंठे पैकी १.३०.०९ व सर्व्हे नं ६०/२ एकुण ०.३७.९० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनाक १०/०५/२०२४

**ॲड वैभव अशोक शिंदे**
पत्ता. मु.पो. नेरळ ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ७७४४८५१४६९


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद.
गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची निवासी सदनिका मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रमोद धोंडू भगत यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या निवासी सदनिका मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**:: मिळकतीचे वर्णन ::**

ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील मौजे चेंढरे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील सर्व्हे नं. ६१/४/१७ या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेल्या 'मधुबन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत' या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका नं. २०३ बिल्टअप क्षेत्रफळ ४०० चौरस फुट (३७.१७ चौमी) ज्यासी ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्र. १०२७/१३.

सदरहू वर्णन केलली निवासी सदनिका मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर निवासी सदनिका मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर निवासी सदनिका मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबेकब्जा वहीवाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्री आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग — सही/-
दिनांक : ०९/०५/२०२४

**ॲड. अनिकेत हनुमंत गुरव**
पत्ता : श्रीबाग नं. २, अलिबाग, जि. रायगड
ऑफीस डॉ. केळकर क्लिनीक शेजारी, शिवाजी महाराज चौक,
अलिबाग, जि. रायगड मोबाईल नं. : ९८५०४०२०५०

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक अरविंद तुकाराम घरत, जितेंद्र अनंत लेले व आसावरी जितेंद्र लेले यांच्या खुद्द मालकीची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | पोट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| नागांव | २४०० | - | ०-०९-४० | ४.१९ |
| ता. अलिबाग | | पो.ख. | ०-००-७० | |
| | | एकूण | ०-१०-१० | |

वर नमूद बागायत मिळकतीपैकी अरविंद तुकाराम घरत, जितेंद्र अनंत लेले व आसावरी जितेंद्र लेले यांच्या नांवे असलेले ०-०४-७० हे. आर., पो.ख. ०-००-३५ हे. आर., एकूण क्षेत्र ०-०५-०५ हे.आर.,आकार रु.२.१० पैसे या मिळकतीबाबत.

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १०/०५/२०२४ — सही /-
अशिलाची सही

**ॲड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड,

**निवडक**

## विश्वचषक सामने पाहा मोफत

**नवी दिल्ली :** येत्या २ जूनपासून वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत विश्वचषक स्पर्धा खेळवली जाणार आहे. या विश्वचषकातील सर्व सामने भारतीय क्रिकेट चाहत्यांना घरबसल्या मोफत पाहाता येणार आहे. सर्व सामने डिज्नी प्लस हॉटस्टारवर मोफत दाखवले जाणार आहेत. विशेष म्हणजे, यासाठी सब्सक्रिप्शन घेण्याचीही गरज नाही. याशिवाय स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर सामन्यांचं लाईव्ह ब्रॉडकास्टिंग केलं जाणार आहे. याशिवाय सामन्यांचं लाईव्ह स्ट्रिमिंग डिज्नी प्लस हॉटस्टारवर मोफत पाहाता येणार आहे.

## रोहितला विश्रांतीची गरज

**नवी दिल्ली :** आयपीएलच्या यंदाच्या हंगामाचा शेवट होताच, येत्या १ जूनपासून अमेरिका आणि वेस्ट इंडिज या देशात क्रिकेट महाकुंभ म्हणजेच टी-ट्वेंटी वर्ल्ड कपची धमाकेदार स्पर्धा रंगणार आहे. भारतीय संघ रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळेल. मात्र, त्याआधी रोहित शर्माला विश्रांती देणे गरजेचे आहे, असा सल्ला ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार मायकल क्लार्क याने दिला आहे. विशेषत: रोहितने आयपीएल २०२४ मध्ये चांगली सुरुवात केल्यामुळे तो आता थोडा थकला आहे, असं क्लार्कने म्हटलं आहे.

## यशस्वी येणार सलामीला?

**नवी दिल्ली :** आगामी टी-२० विश्वचषकाला जूनपासून सुरुवात होणार असून, भारतीय संघाची निवडही करण्यात आली आहे. भारताचा पहिला सामना ५ जूनला आयर्लंडशी होणार आहे. दरम्यान, डावाची सुरुवात करण्यासाठी कर्णधार रोहित शर्माबरोबर यशस्वी जैसवाल सलामीला येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कारण, यशस्वीचा संघामध्ये समावेश करण्यात आला असून, तो सध्या चांगला फॉर्ममध्ये आहे. त्यामुळे भारताचा सलामीवीराचा प्रश्न सुटला असून, यानंतर विराट कोहली तिसऱ्या क्रमांकावर खेळताना दिसण्याची शक्यता आहे.

## रोहित सोडणार मुंबईची साथ

**नवी दिल्ली :** मुंबई इंडियन्समध्ये झालेल्या खांदेपालटवरून वसिम अक्रमने नाराजी व्यक्त केली. हार्दिक पांड्याला कर्णधारपद दिल्याने मुंबई इंडियन्सचे चाहते निराश झाले आहेत. रोहित शर्मा आगामी आयपीएल हंगामात मुंबई इंडियन्सचा भाग नसेल, अशी भविष्यवाणी पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू वसिम अक्रमने केली आहे. त्यावेळी अक्रमने रोहितच्या फलंदाजीचं कौतुकही केलं. तर, रोहितला आगामी हंगामामध्ये कोलकाताकडून खेळताना पहायला आवडेल, असंही अक्रमने म्हटलं आहे.

## फुटबॉलमध्ये सुरक्षितेत वाढ

**नवी दिल्ली :** भारतातील फुटबॉल संबंधित वातावरण सुरक्षित व सर्वसमावेशक असायला हवे यासाठी अखिल भारतीय फुटबॉल संघटनेकडून (एआयएफएफ) नव्या धोरणाचा अवलंब करण्यात आला आहे. एआयएफएफच्या कार्यकारी समितीकडून बुधवारी लैंगिक छळ प्रतिबंध (प्रिवेंशन ऑफ सेक्युअल हरासमेंट, पीओएसएच) धोरणावर शिक्कामोर्तब करण्यात आला. त्यामुळे आता भारतातील फुटबॉल क्षेत्रात लैंगिक छळाला आळा बसेल, असे एआयएफएफचे प्रभारी सचिव एम. सत्यनारायण यांनी सांगितले.

# हैदराबादच्या विजयाने मुंबईचा ‘खेळ खल्लास’

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**सनरायझर्स हैदराबादने आयपीएलच्या इतिहासात प्रथमच लखनऊ सुपर जायंट्सचा पराभव केला. हैदराबादने १० गडी राखून हा ऐतिहासिक विजय नोंदवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना लखनऊने २० षटाकांमध्ये चार गडी गमावून १६५ धावा केल्या होत्या. त्याला प्रत्युत्तर देताना हैदराबाद संघाने ९.४ षटकांमध्ये १६६ धावांचे लक्ष्य गाठलं. हैदराबादने ६२ चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला अन् मोठ्या विक्रमाची नोंद केली. याचबरोबर हैदराबादने गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी झेप घेतली आहे. तर, दुसरीकडे आता मुंबई इंडियन्सचा आयपीएलमधून पत्ता कट झाला आहे.**





### ■ यंदाच्या हंगामातून बाहेर पडणारा पहिला संघ

हैदराबादने लखनऊचा पराभव केल्यामुळे आता मुंबई इंडियन्स आयपीएलच्या यंदाच्या हंगामामधून बाहेर पडणारा पहिला संघ ठरला आहे. आजच्या विजयामुळे आता हैदराबादचा संघ १४ गुणांसह तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे. तर पहिल्या आणि दुसऱ्या स्थानी अनुक्रमे कोलकाता नाइट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स प्रत्येकी १६-१६ गुणांसह कायम आहे. तर चेन्नई १२ गुणांसह चौथ्या स्थानी आहे. त्याचबरोबर लखनऊ आणि दिल्लीच्या खात्यातदेखील १२-१२ गुण आहेत. येत्या १४ मे रोजी लखनऊ आणि दिल्लीचा सामना होईल. यात कोणताही संघ जिंकला तरी त्यांचे १४ गुण होतील. सामना जरी ड्रॉ झाला तरी दोन्ही संघांकडे कमीत कमी १३-१३ अंक गुण असणार आहेत. हेच गुण मुंबईच्या गुणांपेक्षा जास्त असतील.

मुंबई इंडियन्सच्या खात्यात आता ८ गुण आहेत. तर त्यांना अजून दोन सामने खेळायचे आहेत. मुंबई कितीही जोर लावला तरी मुंबईकडे १२ च गुण होतील. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत मुंबईला १३ गुण घेता येणार नाहीत. त्यामुळे मुंबई इंडियन्सचा संघ यंदाच्या आयपीएलमधून बाहेर पडला आहे.

## हेड-शर्माची विस्फोटक फलंदाजी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सनरायजर्स हैदराबादने लखनऊ सुपर जायंट्सवर आयपीएलच्या १७ व्या मोसमातील ५७ व्या सामन्यात १० गड्यांनी धमाकेदार विजय मिळवला आहे. लखनऊ सुपर जायंट्सने सनरायजर्स हैदराबादला विजयासाठी १६६ धावांचं आव्हान दिलं होतं. हैदराबादने हे आव्हान ९.४ षटाकांमध्ये सहज पूर्ण केलं. ट्रेव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा या सलामी जोडीने विस्फोटक फलंदाजी करीत धावांचा अक्षरशः पाऊस पाडला. त्यामुळे हैदराबादला १० षटाकंच्याा आतच विजय मिळवता आहे.

ट्रेव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा या सलामी जोडी मैदानात येताच

### हैदराबादचा धावांचा पाऊस

विस्फोटक फलंदाजी केली आणि विजय मिळवूनच विश्रांती घेतली. या दोघांनी पावर प्लेमध्येच १०० धावा जोडल्या. त्यानंतर दोघांनी आपला दांडपट्टा कायमच ठेवला. या दोघांनी ९.४ षटकांमध्ये १६७ धावांची नाबाद सलामी विजयी भागीदारी केली. अभिषेक शर्मा याने ६ षटकार आणि ८ चौकारांसह २६७.८६ च्या स्ट्राईक रेटने ७५ धावांची नाबाद खेळी केली. तर ट्रेव्हिस हेड याने ३० चेंडूंमध्ये ८ षटकार आणि ८ चौकारांसह २९६.६७ च्या स्ट्राईक रेटने ८९ धावा केल्या. या दोघांनी लखनऊच्या गोलंदाजांची जोरदार धुलाई केली.

## टेनिस क्रिकेटमधून ‘सुपला शॉट’ शिकलो

**■ सूर्यकुमारकडून जुन्या आठवणींना उजाळा**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

क्रिकेटमध्ये अनेक फलंदाजांचे स्वत:चे असे काही फटके आहेत, ज्यांचे नाव त्या-त्या फलंदाजाशी कायम जोडले जाते. असाच एक ‘सुपला शॉट’ या फटक्याला सूर्यकुमार यादवच्या नावाशी जोडले गेले आहे. सूर्यकुमारने त्याच्या या विशेष फटक्याची गोष्टही सांगितली. ‘लहानपणी टेनिस चेंडूने क्रिकेट खेळताना हा फटका मारण्यास शिकलो,’ असे सूर्याने म्हटले. एका कार्यक्रमात सूर्यकुमारने या फटक्याची माहिती सांगितली.

तो म्हणाला की, ‘मला वाटते की, या फटक्याचे नाव मुंबईतील स्थानिक टेनिस बॉल क्रिकेटवरून आले आहे. मी टेनिस बॉल क्रिकेटमध्ये हा फटका मारण्यास सुरुवात केली. चाहत्यांनी या फटक्याशी माझं नाव जोडले आणि त्याला एक नाव दिले. जेव्हा हा फटका खेळला जातो आणि त्याला ‘सुपला शॉट’ असे म्हटले जाते आणि हे ऐकायला चांगले वाटते.’ सूर्याने पुढे म्हटले की, या फटक्याची गोष्ट मजेशीर आहे. मी शाळेतील मित्रांसोबत सिमेंटच्या खेळपट्टीवर क्रिकेट खेळायचो आणि ऑफसाइडला २० मीटरची सीमारेषा, तर उजवीकडे ९०-१०० मीटरची सीमारेषा होती.



आम्ही पावसाळ्यात रबरी चेंडूने खेळायचो आणि चेंडू टाकण्यापूर्वी तो ओला करायचो. गोलंदाज गुडघ्यापासून डोक्यापर्यंत चेंडूचा मारा करत, त्यामुळे चेंडूचा मार सहन न करता धावा हव्या असतील, तर हा फटका मारता आलाच पाहिजे. हा फटका मी रबरी चेंडूने इतक्या वेळा खेळलोय की, आता हा फटका माझ्याकडून आपसूकच मारला जातो.’

## मुंबईसाठी हार्दिक पांड्या अपयशी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आयपीएल २०२४ च्या या हंगामात मुंबई इंडियन्स काही मोठ्या बदलांसह मैदानात उतरला होता. मुंबईने रोहित शर्माच्या जागी संघाची कमान हार्दिक पांड्याकडे सोपवली होती. मात्र, मुंबई इंडियन्सचा कर्णधार म्हणून हार्दिक पांड्याचा पहिला हंगाम खूपच खराब गेला. त्याचा संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. याआधी हार्दिक पांड्याने गुजरात टायटन्सचे २ हंगाम कर्णधारपद भूषवले होते आणि दोन्ही वेळा संघाला अंतिम फेरीत नेले होते. एकदा संघाला चॅम्पियन बनवण्यातही तो यशस्वी झाला होता.

आयपीएलच्या इतिहासात मुंबई इंडियन्स संघ पहिल्यांदाच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडण्याची ही दुसरी वेळ आहे. यासह हार्दिक पांड्या हा मुंबईचा दुसरा कर्णधार ठरला आहे, ज्याच्या नेतृत्वाखाली संघाला प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडावे लागले आहे. तर, २०२२ च्या सुरुवातीला रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली संघ प्रथमच प्लेऑफमधून बाहेर पडला होता.सध्या गुणतालिकेत मुंबईचा संघ नवव्या स्थानावर आहे. फक्त गुजरात टायटन्स संघ त्याखाली आहे. त्याने ११ सामन्यांत ४ जिंकले आहेत आणि ७ सामने गमावले आहेत.



## कबड्डी स्पर्धेत बाळनंद कासू विजेता

**। गडब । वार्ताहर ।**

येळंबादेवी क्रीडा मंडळ आमटेम आयोजित कबड्डी स्पर्धे त बाळनंद कासू संघाने विजेतेपद मिळविले.

या स्पर्धेचे उद्‌घाटन शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख विष्णुभाई पाटील, समन्वयक नरेश गांवड, विभाग प्रमुख गजानन मोकल, पेण कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती लक्ष्मण गावंड, भारतीय सैनिक, युवराज तांबोळी, सामाजिक कार्यकर्ते सचिन तांबोळी आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भारतीय सैन्य दलात असलेले सैनिक युवराज तांबोळी यांचा सत्कार शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख विष्णु पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, तर कबड्डी खेळाडूंना विष्णु पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक बालनंद कासू, द्वितीय क्रमांक श्री गावदेवी मुंढाणी, तृतीय क्रमांक अरुण पाटणी, चतुर्थ क्रमांक वादळ सलिंदे यांनी पटकाविला. स्पर्धेचे पारितोषक वितरण भारतीय सैनिक युवराज तांबोळी, सामाजिक कार्यकर्ते सचिन तांबोळी, किशोर गायकर, गजानन मोकल, लक्ष्मण तांबोळी आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## ॲड. पुंडलिक मालोरेंना महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील न्हावे गावाचे सुपुत्र तथा ॲड. पुंडलिक तुकाराम मालोरे यांना राज्यस्तरीय महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार २०२४ जाहीर झाला असल्याची माहिती निवड पत्र पाठवून फाऊंडेशनचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष पत्रकार संजय पवार व फाऊंडेशनचे रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे गुरुजी यांनी दिली. या पुरस्काराचे वितरण रविवार, दि. १२ मे रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, बाजी प्रभू देशपांडे चौक, पन्हाळगड, जि. कोल्हापूर येथे होणार आहे.



आविष्कार फाऊंडेशन ही संस्था सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, आरोग्य, सांस्कृतिक क्षेत्रात गेली १८ वर्षे कार्यरत आहे. या फाऊंडेशनतर्फे समाजात वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा जिल्हा व राज्य स्तरावर पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते यथोचित गौरव करण्यात येतो. ॲड. मालोरे यांच्या कार्याची दखल हा पुरस्कार त्यांना देण्यात येणार आहे.

## दिपक मोकल राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

को.ए.सो. विद्या संकुलाचे माजी मुख्याध्यापक व क्रीडा शिक्षक दिपक गजानन मोकल यांना क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल रियल लाईफ सुपर हिरो म्हणून राष्ट्रीय प्रतिभा सन्मान पुरस्काराने नुकतेच दिल्ली येथे सन्मानित करण्यात आले.

दिल्ली तीन मूर्ती भवन येथे दि. २८ एप्रिल रोजी आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री व भारत नृत्य डान्सर सुधाचंद्रन यांच्या हस्ते क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय काम केल्याबद्दल रियल लाईफ सुपर हिरो म्हणून दिपक मोकल यांना मेडल, सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांच्यासमवेत त्यांच्या पत्नी सौ. मोकल उपस्थित होत्या.

रेवदंडा येथील रहिवासी असलेले दिपक मोकल यांचे मुळ गाव पेण तालुक्यातील बेनवले आहे. अलिबाग को.ए.सो. संकुलात नोकरी करत असताना तीस वर्षे त्यांनी क्रीडा क्षेत्रात प्रशिक्षक म्हणून योगदान दिले. सध्या ते डायरेक्ट हॉलिबॉल असोसिएशनच महाराष्ट्रचे जनरल सेक्रेटरी व डायरेक्ट हॉलिबॉल फेडरेशन इंडियाचे जनरल सेक्रेटरीम्हणून क्रियाशील आहेत. दिपक मोकल क्रीडा शिक्षक तसेच राष्ट्रीय कबड्डी पंच कार्यरत असताना ग्रामीण




भागातील क्रीडा संस्थांमध्ये कबड्डी, खो-खो, हँडबॉल, ॲथलेस्टिक, कॅरम या खेळांचा प्रचार व प्रसार केला असून, आजपर्यंत २२ राष्ट्रीय खेळाडू तयार केले आहेत. रायगड जिल्हाचे कबड्डी पंच म्हणून प्रतिनिधित्व करताना त्यांनी महाराष्ट्र, तामिळनाडू, बिहार, पाटणा, पतियाळा, पंजाब या ठिकाणी उत्तम काम केले आहे.

दिपक मोकल यांना क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल रायगड भूषण, राज्य क्रीडारत्न, राष्ट्रीय क्रीडा रत्न, आदर्श जिल्हा क्रीडा पुरस्कार, राष्ट्रीय खेळ गौरव पुरस्कार, महाराष्ट्र शासन जिल्हा गुणवंत क्रीडा पुरस्कार आदी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

## प्रवचनकार पांडुरंग मारणे यांना पुरस्कार जाहीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील वावे तर्फे निजामपूर गावाचे रहिवासी तथा सेवानिवृत्त वायरमन पांडुरंग बाबू मारणे यांना राज्यस्तरीय महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार २०२४ जाहीर झाला असल्याची माहिती निवड पत्र पाठवून फाऊंडेशनचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष पत्रकार संजय पवार व रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे गुरुजी यांनी दिली. या पुरस्काराचे वितरण रविवार, दि. १२ मे रोजी सकाळी ११ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, बाजी प्रभू देशपांडे चौक, पन्हाळगड, जि. कोल्हापूर येथे होणार आहे.



पांडुरंग मारणे हे माणगाव तालुक्यातील वावेतर्फे निजामपूर गावाचे रहिवासी असून, सामाजिक कार्यात नेहमीच ते सहभागी होत असतात. कीर्तन व प्रवचन करून ते समाजाला आध्यत्मिकतेचे ज्ञान देऊन समाज प्रबोधन करीत असतात. त्यांना यापूर्वी माणगाव तालुका पत्रकार संघातर्फे समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# कसोटी क्रिकेटला वाचवणे आपल्या हाती

## ब्रायन लाराचे आयसीसीला साकडे

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**जगभरातील वाढत्या टी-२० लीगचे पडसाद कसोटी क्रिकेटवर उमटू लागले आहेत. याच कारणामुळे टी-२० लीगवर नियंत्रण करून कसोटी क्रिकेटला वाचवा, अशा शब्दांत वेस्ट इंडीजचा महान क्रिकेटपटू ब्रायन लारा याने आयसीसीकडे साकडे घातले आहे. एका क्रीडा वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ब्रायन लारा याने आपले मत व्यक्त केले.**

तो पुढे म्हणाला, फुटबॉलमध्ये वर्षभर लीगला प्राधान्य देण्यात येते. बार्सिलोना, मँचेस्टर युनायटेडसारख्या क्लबमधील खेळाडू १२ महिने खेळताना दिसतात. अशा लीगमुळे देशांनाही फायदा होतो. या खेळामध्ये पैसा कमावण्यासाठी द्विपक्षीय मालिका आयोजनाची गरज भासत नाही, पण ही बाब फुटबॉलमध्ये चालू शकते. क्रिकेटमध्ये मात्र लीगला प्राधान्य देता येणार नाही, असे स्पष्ट करताना ब्रायन लारा म्हणाला, “भारत, ऑस्ट्रेलिया व इंग्लंड या देशांची आर्थिक स्थिती क्रिकेटमुळे आणखी भक्कम होते, पण इतर देशांची परिस्थिती भिन्न आहे. वेस्ट इंडीजला आर्थिक साह्य मिळावे यासाठी भारताविरुद्धच्या मालिकेची गरज भासते. भारत, ऑस्ट्रेलिया व इंग्लंड वगळता क्रिकेट खेळत असलेल्या देशांसाठी लीगपेक्षा द्विपक्षीय मालिका महत्त्वाच्या ठरतात. तीन बलाढ्य देश वगळता इतर देशांतील खेळाडू देशांपेक्षा जगभरातील लीगला प्राधान्य देतात. अशा प्रकारच्या लीगमुळे त्यांच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह होत असतो.



### प्रेक्षकांना कसोटीचे आकर्षण वाढावे

**ब्रायन लारा याची कसोटी क्रिकेटला वाचवण्याची तळमळ दिसून आली. तो म्हणाला, टी-२० क्रिकेट लढतीचा एक सामना तीन ते साडेतीन तासांचा असतो. त्यामुळे या लढतींना प्रायोजकही मिळतात. कसोटी क्रिकेट पाच दिवस चालते. प्रायोजक प्रदीर्घ काळ चालणाऱ्या लढतींकडे कानाडोळा करतात. आयसीसीने याकडे लक्ष द्यायला हवे. कसोटी क्रिकेटकडेही प्रेक्षकांची पावले वळायला हवीत.**

## शिवशक्ती, स्वराज्य, श्रीरामची आगेकूच

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

श्री मावळी मंडळाच्या राजस्तरीय कबड्डी स्पर्धेत आरएफ नाईक (ठाणे), शिवशक्ती स्पोर्ट्स क्लब (धुळे), होतकरू मित्र मंडळ (ठाणे), स्वराज्य स्पोर्ट्स क्लब (मुंबई उपनगर), श्री राम कबड्डी संघ (पालघर), शिवशक्ती महिला संघ (मुंबई शहर) या महिला संघानी उपउपांत्य फेरा गाठली तर पुरुष गटात जय बजरंग क्रीडा मंडळ, वासिंद (ठाणे), हुतात्मा शांताराम कालवार (ठाणे),नवरत्न मंडळ (मुंबई उपनगर), श्री विठ्ठल क्रीडा मंडळ (ठाणे), जय बजरंग रोहा (रायगड), श्री हनुमान सेवा (ठाणे), विजय काल्हेर (ठाणे) या संघांनी दणदणीत विजयासह चौथ्या फेरीत प्रवेश केला.

ठाण्यात सुरू असलेल्या या स्पर्धेत महिला गटातही जोरदार चुरस पाहायला मिळतेय. पालघरच्या श्री राम कबड्डी संघाने मुंबई उपनगरच्या नवशक्ती स्पोर्ट्स ॲफेडमी संघाचा ३७-२२ असा १५ गुणांनी पराभव केला तर धुळ्याच्या शिवशक्ती स्पोर्ट्स क्लबने ठाण्याच्या जय भारतचा ४५-१५ असा फडशा पाडत उपउपांत्यपूर्व फेरी गाठली.

पुरुष गटात ठाण्याच्या हुतात्मा शांताराम कालवार संघाने अलहिदा डावात ठाण्याच्या आत्माराम क्रीडा मंडळाचा अवघ्या एकाने गुणाने पराभव करत चौथ्या फेरीत स्थान मिळवले. मध्यंतराला हुतात्मा शांताराम कालवारकडे १९-१४ अशी ५ गुणांची आघाडी होती. मग आत्माराम क्रीडा मंडळाच्या विवेक म्हात्रेने खोलवर चढाया करीत सामना २८-२८ असा बरोबरीत सोडवला. त्यानंतर झालेल्या अलहिदा डावात हुतात्मा शांताराम कालवार संघाने आपल्या दुसर्या चढाईत दोन गुणांची कमाई केली व सामना एक गुणाने जिंकला. ठाण्याच्या श्री विठ्ठल क्रीडा मंडळाने मुंबई उपनगरच्या अभिनव क्रीडा मंडळाचा ४२-३५ असा ७ गुणांनी पराभव केला. या संघाच्या पुढील कामगिरीवर चाहत्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)